# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचा-यांचे (रजेबाबत) विनियम, १९७५

# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचा-यांचे (रजेबाबत) विनियम, १९७५


## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ
२. नियम लागू होण्याची व्याप्ती
३. व्याख्या
४. स्वीयेतर सेवेवरील कर्मचारी

## प्रकरण दोन

### सर्वसाधारण शर्ती

५. रजेचा हक्क
६. रजेच्या मागणीचे विनियम
७. सेवेतून बडतर्फ केल्यानंतर, काढून टाकल्यानंतर किंवा राजीनामा दिल्यानंतर जमेस असलेल्या रजेवरील हक्क समाप्त होणे.
८. एका प्रकारच्या रजेचे दुस-या प्रकारच्या रजेत परिर्वतन
९. वेगवेगळया प्रकारच्या रजा जोडून घेणे
१0. अखंडित रजेची कमाल मर्यादा
११. रजेवर असताना सेवा किंवा नोकरी स्वीकारणे

## प्रकरण तीन

### रजा मंजूर करणे व रजेवरून परत येणे

१२. रजेसाठी अर्ज करणे
१३. रजेचा हिशेब
१४. रजेच्या हक्काची/ अनुज्ञेयतेची पडताळणी
१५. विवक्षित परिस्थितीमध्ये रजा न देणे
१६. वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावर रजा मंजूर करणे
१७. कामावर पुन्हा रूजू होण्यास पात्र ठरण्याची शक्यता नसलेल्या कर्मचा-याला द्यावयाची रजा
१८. रजेचा प्रारंभ व समाप्ती
१९. रजेला सुट्टया जोडणे
२0. रजा संपण्यापूर्वी कामावर परत बोलावणे
२१. रजेवरून परत येणे
२२. रजेवरून परत आल्यानंतर पदस्थापना करणे
२३. रजा संपल्यानंतरची अनुपस्थिती

## प्रकरण चार

### देय व अनुज्ञेय रजेचे प्रकार

२४. अर्जित रजा

२५.	अर्जित रजेची गणना
२६.	अर्धवेतनी रजा
२७.	परिवर्तित रजा
२८.	अनुज्ञेय नसणारी/ अनर्जित रजा
२९.	असाधारण रजा
३०.	सेवा निवृत्तीनंतर पुनर्नियुक्त झालेली व्यक्ती
३१.	निवृत्तीपूर्व रजा
३२.	नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या अथवा सेवा सोडून जाण्याच्या दिनांकानंतरची रजा
३२.क. नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या अथवा सेवा सोडून जाण्याच्या दिनांकानंतरच्या रजेच्या बदल्यात सममूल्य रोख रक्कम
३२.ख)सेवेत असताना मृत्यू झाल्यास रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम
३३.	रजा वेतन
३४.	कारखाने अधिनियम १९४८ द्वारे विनियम कलेले कर्मचारी
३५.	रजा वेतनाचे आगाऊ प्रदान

**प्रकरण पाच**

**विशेष प्रकारच्या रजा**

३६.	प्रसूती रजा
३७.	हेतूपुरस्सर केल्या गेलेल्या रजेच्या संबंधात विशेष विकलांगता रजा
३८.	अपघाती रजेबद्दल विशेष विकलांगता रजा
३९.	रूग्णालयीन रजा

**प्रकारण सहा**

**संकीर्ण**

४०.	विनियमात विनिर्दिष्ट तरतूद न केलेल्या बाबींमध्ये शासकीय नियम लागू करणे
४१.	निर्वचन
४२.	विनियम शिथिल करण्याचा अधिकार
४३.	निरसन व व्यावृत्ति

अनुसूची एक
अनुसूची दोन
नमुना एक
नमुना दोन
नमुना तीन

# मुंबई बंदर विश्वस्त मंडळ कर्मचारी (रजा) विनियम, १९७५

# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचा-यांचे (रजेबाबत) विनियम, १९७५

मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) याच्या कलम २८ च्या खंड (ख) व (ड) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि या विषयावरील विद्यमान विनियमांचे व आदेशांचे अधिक्रमण करून, उक्त अधिनियमाच्या कलम १२४ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, केंद्र सरकारची मान्यता घेऊन, मुंबई पोर्ट ट्रस्टचे विश्वस्त मंडळ, याद्वारे पुढील विनियम करीत आहे. हेच विनियम, उक्त कलम १२४ च्या पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आले आहेत.

## प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ** - (१) या विनियमांस मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (रजेबाबत) विनियम, १९७५, असे म्हणावे.

(२) हे विनियम, केंद्र सरकारची मंजुरी मिळाल्याच्या शासकीय राजपत्रात प्रसिध्द केल्याच्या दिनांकास अंमलात येतील.

२. **नियम लागू होण्याची व्याप्ती** - या विनियमात, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त हे विनियम, मंडळाच्या अधीन सेवांवर किंवा पदांवर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना लागू असतील. परंतु हे विनियम पुढील व्यक्तींना लागू होणार नाहीत;

(क) नैमित्तिक किंवा अंशकालीन रोजगारातील व्यक्ती;

(ख) आकस्मिकता निधीतून रक्कम प्रदान केलेल्या व्यक्ती;

(ग) मर्यादित कालावधीकरिता, केंद्र किंवा राज्य शासन किंवा इतर ठिकाणाहून प्रतिनियुक्तीवर असलेल्या व्यक्ती;

(घ) करारामध्ये अन्यथा तरतूद केलेली असेल तेखेरीज करुन करारावर नेमणूक केलेल्या व्यक्ती;

(ड.) तात्पुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्या अन्वये ज्यांच्याकरिता विशेष तरतूदी करण्यात आल्या असतील अशा संबंधीत व्यक्ती.

३.**व्याख्या** **(१)** या विनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर-

(क) पदाच्या प्रवर्गाशी संबंधित "रजा मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी" याचा अर्थ, या विनियमांच्या पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील प्रवर्गासमोर, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विविध प्रकारच्या रजा मंजूर करण्यास सक्षम म्हणून विनिर्दिष्ट केलेला प्राधिकारी, असा आहे.

**<u>स्पष्टीकरण</u> :** एखाद्या प्राधिका-याला ह्या विनियमांद्वारे प्रदान करण्यात आलेले रजा मंजूर करण्याबाबतचे अधिकार त्याला दुय्यम असणा-या दुस-या प्राधिका-याने वापरणे हे त्याच्या क्षमतेत असेल.

(ख) "मंडळ", "अध्यक्ष", "उपाध्यक्ष" व "विभागप्रमुख" यांना मुख्य पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ यामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिले असतील तेच अर्थ असतील.

२(ग) "वर्ग एकची पदे", "वर्ग दोनची पदे", "वर्ग तीनची पदे" व "वर्ग चारची पदे" यांना मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) विनियम, १९७६ यामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

(घ) "सेवा पूर्ण केलेली वर्षे" किंवा "एका वर्षाची सलग सेवा" याचा अर्थ, मंडळाच्या अधीन विनिर्दिष्ट कालावधीची सलग सेवा, असा आहे आणि यामध्ये सेवेवर खर्च केलेला तसेच, असाधारण रजेसह रजेचा कालावधी यांचा समावेश होतो.

१(ड.) एखाद्या कर्मचा-या संबंधात "सेवानिवृत्तिचा दिनांक" किंवा "त्याच्या सेवानिवृत्तिचा दिनांक" याचा अर्थ, कर्मचारी, त्याच्या सेवेच्या नियमन करणा-या अटी व शर्तीअन्वये सेवा-निवृत्तिसाठी विहित केलेले वय ज्या महिन्यात पूर्ण करील त्या महिन्याच्या शेवटच्या दिवसाची मध्यान्ह, असा आहे.

(च) "स्वीयेतर सेवा" याचा अर्थ, ज्या सेवेत, मंडळाचे सर्वसाधारण लेखे किंवा बंदरवाटाडयांच्या वेतनाचे लेखे याव्यतिरिक्त कोणत्याही मार्गाने सक्षम प्राधिका-याच्या मंजुरीने एखाद्या कर्मचा-याला त्याचे वेतन मिळत असेल अशी सेवा, असा आहे;

(छ) "नमुना" याचा अर्थ, या विनियमाच्या दुस-या अनुसूचीला जोडलेला नमुना, असा आहे;

(ज)"स्थायी/कायम सेवेतील कर्मचारी", याचा अर्थ जो स्थायीरित्या किंवा तात्पुरते स्थायीरित्या स्थायी पद धारण केले आहे किंवा ज्याचा

अशा पदावरील धारणाधिकार, निलंबित करण्यात आलेला नाही, असा कर्मचारी असा आहे;

(२) यामध्ये वापरण्यात आलेले आणि व्याख्या न केलेले परंतु मुंबई पोर्ट ट्रस्ट, वेतन व भत्ते, रजा व निवृत्तिवेतन नियम यात व्याख्या केलेल्या शब्द व शब्दप्रयोग यांना उक्त सारसंग्रहामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिले असतील, तेच अर्थ असतील.

४. **स्वीयेतर सेवेवरील कर्मचारी:** ज्या कर्मचा-यांना हे विनियम लागू होतात, अशा कर्मचा-यांना स्वीयेतर सेवेत असताना, हया विनियमांद्वारे नियमन करावयाचे चालू राहील.

## प्रकरण दोन

## सर्वसाधारण शर्ती

**५. रजेचा हक्क** (१) हक्क म्हणून रजा मागता येत नाही.

(२) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, लोकसेवेच्या निकडीमुळे, कोणत्याही प्रकारची रजा नाकारणे किंवा रद्द करणे आवश्यक असेल तेव्हा, तसे करू शकेल परंतु, त्या प्राधिका-यास, कर्मचा-याच्या लेखी विनंतीखेरीज देय असलेल्या आणि मागितलेल्या रजेचा प्रकार बदलता येणार नाही.

**६. रजेच्या मागणीचे विनियमन**

एखाद्या कर्मचा-याच्या रजेच्या मागणीचे विनियमन, रजेसाठी अर्ज केला असेल त्यावेळी किंवा मंजूर करतेवेळी अंमलात असलेल्या विनियमांद्वारे करण्यात येईल.

**७. सेवेतून बडतर्फ केल्यानंतर, काढून टाकल्यानंतर किंवा राजीनामा दिल्यानंतर जमेस असलेल्या रजेवरील हक्क समाप्त होणे**

(१) विनियम ३२ मध्ये आणि या विनियमामध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, मंडळाच्या सेवेतून बडतर्फ केलेल्या किंवा काढून टाकलेल्या किंवा राजीनामा दिलेल्या कर्मया-याच्या जमेस असलेल्या रजेचा हक्क, यथास्थिति अशा बडतर्फीच्या, काढून टाकल्याच्या किंवा राजीनामा दिल्याच्या दिनांकापासून समाप्त होतो.

(२) सेवेतून बडतर्फ केलेल्या किंवा काढून टाकलेल्या आणि अपील केल्यानंतर किंवा पुनरीक्षण केल्यानंतर पुन्हा सेवेत घेतलेल्या कर्मचा-याला, यथास्थिति अशा बडतर्फीच्या किंवा सेवेतून काढून टाकण्याच्या अगोदरची त्याची सेवा रजेकरिता हिशेबात धरण्याचा हक्क असेल.

(३) भरपाई किंवा रूग्णता निवृत्तिवेतनावर किंवा उपदानावर सेवानिवृत्त झालेल्या ज्या कर्मचा-यांची पुनर्नियुक्ती

झालेली आहे आणि ज्याची मागील सेवा निवृत्तिवेतनासाठी हिशेबात घेण्याची परवानगी दिलेली आहे, त्याला त्याची पूर्वीची सेवा रजेसाठी हिशेबात धरण्याचा हक्क असेल.

## ८. एक प्रकारच्या रजेचे दुस-या प्रकारच्या रजेत परिवर्तन

(१) रजा मंजूर करणारा प्राधिकारी कर्मचा-याच्या विनंतीवरुन, त्याने घेतलेल्या रजेचे दुस-या प्रकारच्या रजेत भूतलक्षी प्रभावाने परिवर्तन करु शकेल. मात्र, रजा मंजूर केली त्यावेळेस ती रजा देय व अनुज्ञेय असली पाहिजे. परंतु, कर्मचारी हक्क म्हणून अशा परिवर्तनाची मागणी करू शकत नाही:

" परंतु असे की, संबंधित कर्मचा-याने लाभ घेतलेल्या रजेचा संबंधित कालावधी समाप्त झाल्यावर, तो कामावर रूजू झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीत, असा प्राधिकारी किंवा त्याच्यावतीने पदनिर्देशित केलेला इतर कोणताही प्राधिकारी यांना अशी कोणतीही विनंती प्राप्त झाल्याखेरीज त्याबाबत विचार केला जाणार नाही.

(२) एका प्रकारच्या रजेचे दुस-या प्रकारच्या रजेत परिवर्तन, कर्मचा-याला अंतिमतः मंजूर केलेल्या रजेच्या आधारावर त्याच्या रजा वेतनाचे समायोजन करण्याच्याअधीन, करण्यात येईल, म्हणजेच, त्याला जादा प्रदान केलेली कोणतीही रक्कम वसूल केली जाईल,किंवा त्याला देय असणारी कोणतीही थकबाकीची रक्कम प्रदान करण्यात येईल.

**टीपः** वैद्यकीय प्रमाणपत्रावर किंवा अन्यथा मंजूर केलेली असाधारण रजा विनियम २८ च्या तरतुदींच्या अधीन राहून भूतलक्षी प्रभावाने अनर्जित रजेमध्ये परिवर्तित करता येईल.

## ९. वेगवेगळया प्रकारच्या रजा जोडून घेणे

या विनियमांमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, या विनियमांखालील कोणत्याही प्रकारची रजा, दुस-या कोणत्याही प्रकारच्या रजेबरोबर किंवा अशा रजेला जोडून मंजूर करता येईल.

**स्पष्टीकरण:** नैमित्तिक रजा या विनियमांखाली रजा म्हणून मानली जात नसल्यामुळे, या विनियमांनुसार अनुज्ञेय असलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या रजेला ती जोडून घेता येणार नाही.

## १0. अखंडित रजेची कमाल मर्यादा

एखाद्या प्रकरणातील अपवादात्मक परिस्थिती विचारात घेऊन अध्यक्षाने, अन्यथा निर्णय दिल्याखेरीज, कोणत्याही कर्मचा-याला, सतत पाच वर्षाहून अधिक कालावधीकरिता कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही.

## ११. रजेवर असताना सेवा किंवा नोकरी स्वीकारणे

(१) कर्मचारी हा, (एकतर ज्याला विद्यापीठामध्ये किंवा शैक्षणिक किंवा व्यावसायिक संस्थेमध्ये परीक्षक म्हणून प्रासंगिक साहित्यविषयक काम किंवा सेवा हाती घेण्यास परवानगी दिलेली आहे, अशा कर्मचा-याव्यतिरिक्त) रजेवर असताना निवृत्तिपूर्व रजा किंवा सेवानिवृत्तीच्या अथवा सेवा सोडून दिल्याच्या दिनांकानंतर मंजूर केलेली रजा धरून लेखापाल, सल्लागार किंवा विधि किंवा वैद्यक व्यवसायी म्हणून खाजगी व्यवसाय उभारणे यांसह अन्यत्र कोणतीही सेवा किंवा नोकरी-

(क) जर (एक) प्रस्तावित सेवा किंवा नोकरी ही विदेशी सरकारच्या अधीन असेल तर, किंवा (दोन) विदेशी सरकारच्या नियंत्रणाधीन असलेल्या एखाद्या संघटनेमध्ये असेल तर किंवा (तीन) प्रस्तावित सेवेचे किंवा नोकरीचे ठिकाण भारताबाहेर असेल आणि नियोक्ते हे भारतीय नागरिक नसतील किंवा एखादी भागीदारी संस्था

भारतामध्ये नोंदणीकृत नसेल तर, अध्यक्षांची पूर्व परवानगी मिळाल्याशिवाय स्वीकारणार नाही; किंवा

(ख) प्रत्यायोजनामध्ये विनिर्दिष्ट करता येतील अशा कोणत्याही शर्तीच्या अधीन राहून, अध्यक्ष किंवा इतर सर्व प्रकरणांमध्ये ज्याच्याकडे त्याला याबाबतचे अधिकार प्रत्यायुक्त करता येतील असा त्याला दुय्यम असलेला प्राधिकारी, यांची पूर्वमंजूरी मिळाल्याशिवाय स्वीकारणार नाही.

(२) (क) कर्मचारी निवृत्तिपूर्व रजा किंवा सेवानिवृत्तीच्या किंवा सेवा सोडण्याच्या दिनांकानंतर मंजूर केलेल्या रजेव्यतिरिक्त इतर रजेवर असताना त्या कर्मचा-याला इतर कोणतीही सेवा किंवा नोकरी स्वीकारण्यास सर्वसाधारणपणे परवानगी दिली जाणार नाही.

(ख) जर कोणत्याही अपवादात्मक प्रकरणामध्ये अशी परवानगी देणे इष्ट वाटत असेल, तर, त्याला ज्याठिकाणी सेवा किंवा नोकरी करण्याची परवानगी देण्यात आली असेल अशा मंडळाच्या अधीन असलेल्या कार्यालयामध्ये तात्पुरती बदली करता येईल अथवा कोणतीही इतर सेवा किंवा नोकरी स्वीकारण्यापूर्वी त्याला त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल.

(ग) उपखंड (ख) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षाला अपवादात्मक प्रकरणामध्ये आणि त्याच्या स्वेच्छानिर्णयाने, तो विहित करेल अशा अटी व शर्तींना अधीन राहून कर्मचा-याला, केंद्र किंवा राज्य शासन किंवा जहाज कंपनी यांच्याद्वारे संपूर्णपणे किंवा सारत: मालकीचे किंवा नियंत्रणात असलेले महामंडळ यांच्या अंतर्गत भारताबाहेरील सेवेत किंवा नोकरीत त्यांच्या रजेदरम्यान, भारताबाहेर जाणा-या जहाजाचा

प्रमुख म्हणून सक्षमता प्रमाणपत्र किंवा प्रथम श्रेणी अभियंता (मोटार) किंवा (स्टीम व मोटार) म्हणून सक्षमता प्रमाणपत्र ताब्यात घेऊन कर्मचा-याला रजा घेण्याची परवानगी देता येईल.

(३) (क) कोणताही कर्मचारी निवृत्तिपूर्व रजेवर किंवा निवृत्तीच्या किंवा सेवा सोडताना त्याला मंजूर करण्यात आलेली असणारी रजा संपेपर्यंत रजेवर असताना त्याची भारताबाहेरील सेवा किंवा नोकरी स्वीकारण्याची इच्छा असेल तर त्या कर्मचा-याने, याबाबत रजा मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-यांच्या पूर्व परवानगीसाठी संबंधित विभाग प्रमुखामार्फत लेखी अर्ज केला पाहिजे.

(ख)कर्मचा-याने ज्यासाठी कर्मचा-याची प्रयत्न करण्याची इच्छा दर्शविली आहे अशा नोकरीचे स्वरूप व ठिकाण लक्षात घेऊन किंवा जी नोकरी स्वीकारण्याचे प्रस्तावित केले आहे याबाबत अर्जात निर्देश केला असला पाहिजे.

(ग) सर्वसाधारणपणे रजा मंजूर करणा-या प्राधिका-याने -

(एक) कर्मचा-याने सेवेत असताना, प्रस्तावित नियोक्त्या बरोबर, त्याने नंतर त्याची मर्जी दर्शविली होती असा त्याचा संशय उत्पन्न होईल या कारणाने अशा व्यवहारास नकार दिला होता.

(दोन) कर्मचा-याचे कर्तव्य, असे ही असेल की, मंडळाच्या विरोधी भूमीका बजवावी लागू शकेल.

(तीन) नोकरी ही परिपूर्ण नामांकित प्रकारची नाही.

(चार) या नोकरीमुळे प्रमुख पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ याच्या कलम ११७ क च्या तरतुदींचे उल्लंघन होण्याची शक्यता आहे.

या बाबी विचारात घेतल्यानंतरच रजा मागण्याबाबतची परवानगी देण्यात येईल.

(घ) रजा मंजूर करणा-या प्राधिका-याला त्याच्या स्वेच्छाधिकारात, विशिष्ट प्रकरणामधील परवानगी रोखून ठेवता येईल आणि असे करण्यामागचे कारण उघड करणे बंधनकारक असणार नाही. रजा मंजूर करणारा प्राधिकारी, रजा नाकारण्यापूर्वी रजा नाकारण्यामुळे, एखाद्याचे खरोखरच नुकसान होईल, अशा कोणत्याही अपवादात्मक परिस्थितींचा विचार करील.

(ङ) खंड (१) च्या उपखंड (क) मध्ये समाविष्ट असलेल्या प्रकरणांमध्ये/बाबींमध्ये, रजा मंजूर करणारा प्राधिकारी, आवश्यक ती मंजुरी देण्यापूर्वी भारत सरकारची सहमती प्राप्त करील/मिळवील.

(४) निवृत्तिपूर्व रजेच्या दरम्यान नोकरीच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात कोणतीही रजा अर्जित होणार नाही.

(५) जेव्हा एखादा कर्मचारी विनियम ३२ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर १.[ ] रजेवर असेल आणि अशा रजेच्या काळात त्याची नियुक्ति, मंडळाअंतर्गत किंवा केंद्र अथवा राज्य शासनाअंतर्गत किंवा स्थानिक प्राधिकरणाअंतर्गत किंवा केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे संपूर्णपणे किंवा सारत: मालकी असलेल्या किंवा नियंत्रण असलेल्या महामंडळाअंतर्गत झाली असेल तेव्हा, त्याची, तशी

इच्छा असल्यास, त्याला आपली रजा व अशी नोकरी एकाच वेळी चालू ठेवता येईल किंवा या विनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे कमाल मर्यादेच्या अधीन राहून, अशी नोकरी समाप्त होतेवेळी अशा न संपलेल्या रजेच्या भागाचा त्याला लाभ घेता येईल.

# प्रकरण तीन

## रजा मंजूर करणे व रजेवरुन परत येणे

### १२. रजेसाठी अर्ज करणे

रजेसाठीचा किंवा रजा वाढविण्यासाठीचा कोणताही अर्ज, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याकडे नमुना एक मध्ये करण्यात येईल.

### १३. रजेचा हिशेब

कर्मचारी, वर्ग एक किंवा वर्ग दोनचे पद धारण करीत असल्यास, लेखा विभागाकडून आणि कर्मचारी इतर पद धारण करत असल्यास, विभाग प्रमुखाकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडून किंवा अधिका-याकडून, प्रत्येक कर्मचा-याच्या रजेचा हिशेब ठेवला जाईल.

### १४. रजेच्या हक्काची/अनुज्ञेयतेची पडताळणी

रजेचा हिशेब ठेवणा-या प्राधिका-याकडून रजेच्या अनुज्ञेयतेबद्दलचा अहवाल मिळेपर्यंत कर्मचा-याला कोणतीही रजा मंजूर केली जाणार नाही.

### १५. विवक्षित परिस्थितीमध्ये रजा न देणे

ज्याला शिक्षा देण्यास सक्षम असणा-या प्राधिका-याने सेवेतून बडतर्फ करण्याचा किंवा काढून टाकण्याचा अथवा सक्तीने सेवानिवृत्त करण्याचा निर्णय घेतला आहे, अशा एखाद्या कर्मचा-याला रजा मंजूर करण्यात येणार नाही.

### १६. वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावर रजा मंजूर करणे

(१) एखाद्या कर्मचा-याने, वैद्यकीय प्रमाणपत्रावर रजेसाठी केलेल्या अर्जासोबत पोर्ट ट्रस्टच्या वैद्यकीय अधिका-याने किंवा नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाने आजाराचे स्वरूप व

संभाव्य कालावधी शक्य तेवढया स्पष्टपणे नमूद केलेले नमुना दोन मधील वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले असेल.

(२) पोर्ट ट्रस्टचा वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी त्याच्या कामावर रूजू होण्यास कधी तंदुरूस्त असेल, यासाठी कोणतीही वाजवी शक्यता दिसून येत नसेल अशा कोणत्याही प्रकरणामध्ये रजा मंजूर करण्याची शिफारस करणार नाही आणि अशा प्रकरणामध्ये, कर्मचारी मंडळामधील सेवेसाठी कायमस्वरूपी अपात्र आहे, असे मत वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नोंदविण्यात येईल.

(३) रजा मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकरी, त्याच्या स्वेच्छाधिकारात, जर मुख्य वैद्यकीय अधिका-याने त्याने स्वतः वैद्यकीय प्रमाणपत्र दिले नाही, तर शक्य तेवढया लवकरच्या/आधीच्या दिनांकास, अर्जदाराची वैद्यकीय तपासणी करावी, अशी मुख्य वैद्यकीय अधिका-याला विनंती करून, दुसरे वैद्यकीय मत मागवील.

(४) आजाराची वस्तुस्थिती व शिफारस केलेल्या रजेची आवश्यकता या संबंधात या दोन्हीबाबत आपले मत व्यक्त करणे हे मुख्य वैद्यकीय अधिका-याचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनाकरिता एकतर अर्जदाराने त्याच्या समोर किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या वैद्यकीय अधिका-यासमोर उपस्थित राहणे आवश्यक असेल.

(५) या विनियमाखाली वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यामुळे संबंधित कर्मचा-याला रजेचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही; वैद्यकीय प्रमाणपत्र रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याकडे पाठविण्यात येईल आणि त्या प्राधिका-याच्या आदेशाची प्रतिक्षा करण्यात येईल.

(६) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, त्याच्या स्वेच्छाधिकारात, एका वेळेस ७ दिवसांहून अधिक कालावधीसाठीच्या रजेसाठी अर्ज केल्यास, वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याचा हक्क सोडून देईल. तथापि, अशी रजा, वैद्यकीय प्रमाणपत्रावरील रजा (परिवर्तित) समजली

जाणार नाही आणि वैद्यकीय कारणासाठी असलेल्या रजेव्यतिरिक्त इतर रजेमधून वजा करणात येईल.

## १७. <u>कामावर पुन्हा रूजू होण्यास पात्र ठरण्याची शक्यता नसलेल्या कर्मचा-याला द्यावयाची रजा</u>

(१)(क) जेव्हा कर्मचारी कामावर पुन्हा रूजू होण्यास कधीच पात्र ठरण्याची वाजवी शक्यता नाही असे पोर्ट ट्रस्टच्या वैद्यकीय अधिका-याने कळवलेले असेल, तेव्हा अशा कर्मचा-याला रजा नाकारलीच पाहिजे असे नाही.

(ख) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, देय असेल तर पुढील शर्तींवर रजा मंजूर करूशकेलः-

(एक) कर्मचारी पुन्हा कधीही सेवेकरिता पात्र ठरणार नाही असे पोर्ट ट्रस्टचा वैद्यकीय अधिकारी खात्रीपूर्वक सांगू शकत नसल्यास, जास्तीत जास्त एकूण बारा महिन्यांची रजा मंजूर करता येईल आणि अशी रजा पोर्ट ट्रस्टच्या वैद्यकीय अधिका-याकडे पुन्हा निर्देश केल्याशिवाय वाढविता येणार नाही.

(दोन) कर्मचारी यापुढे सेवेकरिता संपूर्णपणे आणि कायमचा असमर्थ असल्याचे पोर्ट ट्रस्टच्या वैद्यकीय अधिका-याने स्पष्ट नमूद केले असेल तर, पोर्ट ट्रस्टच्या वैद्यकीय अधिका-याकडून त्याबाबतचा अहवाल मिळाल्यानंतर कर्मचा-याला रजा किंवा रजावाढ मंजूर करता येईल. परंत, रजा खाती खर्ची घातलेल्या रजेचा कालावधी आणि पोर्ट ट्रस्टच्या वैद्यकीय अधिका-याच्या अहवालाच्या दिनांकानंतरच्या कोणताही कर्तव्य कालावधी मिळून होणारा कालावधी सहा महिन्यांहून अधिक असणार नाही.

(२) यापुढे सेवेकरिता संपूर्णपणे आणि कायमचा असमर्थ असल्याचे पोर्ट ट्रस्टच्या (बंदर विश्वस्तमंडळाच्या) वैद्यकीय अधिका-याने स्पष्ट नमूद केले आहे, असा कर्मचारी -

(क) तो कामावर असेल तर, पोर्ट ट्रस्टच्या (विश्वस्त मंडळ) वैद्यकीय अधिका-याचा अहवाल मिळाल्यानंतर, सेवेसाठी अवैध ठरवून त्याला त्याच दिनांकापासून सेवेतून मुक्त करण्याची तात्काळ व्यवस्था करण्यात यावी. तथापि, जर त्याला उप विनियम (१) अन्वये रजा मंजूर करण्यात आलेली असेल तर, अशी रजा समाप्त झाल्यानंतर त्यास सेवेसाठी रूग्ण/अवैध ठरविण्यात येईल.

(ख) जर तो अगोदरच रजेवर असेल तर, उप विनियम (१) अन्वये कोणतीही रजावाढ मंजूर केली असल्यास, ती रजावाढ समाप्त झाल्यावर त्यास सेवेसाठी रूग्ण ठरविण्यात येईल.

## १८. <u>रजेचा प्रारंभ व समाप्ती</u>

विनियम १९ मध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करुन, ज्या दिवशी कार्यभाराचे हस्तांतरण केले जाते त्या दिवसापासून सामान्यपणे रजा सुरू होते आणि कार्यभार स्वीकारण्याच्या दिवसाच्या अगोदरच्या दिवशी ती समाप्त होते.

## १९. <u>रजेला सुट्टया जोडणे</u>

(१) कर्मचा-याची रजा ज्या दिवशी सुरूहोते त्या दिवसाच्या लगत पूर्वीचा दिवस किंवा ज्या दिवशी त्याची रजा समाप्त होते त्याच्या लगेच नंतरचा दिवस सुट्टीचा असेल किंवा सलग येणा-या सुट्ट्यांपैकी एक दिवस असेल; तेव्हा कर्मचा-याला अशा सुट्टीच्या किंवा सलग येणा-या सुट्टयांच्या आधीच्या दिवसाअखेर त्याचे कामाचे ठिकाण सोडण्यास किंवा अशा सुट्टीच्या किंवा सलग येणा-या सुट्टयांच्या नंतरच्या दिवशी त्या ठिकाणी परत येणास परवानगी देता येईल:

परंतु त्याची बदली किंवा कार्यभारग्रहण यांमध्ये रोखे किंवा स्थायी अग्रिमांव्यतिरिक्त इतर रकमा ताब्यात देणे किंवा घेणे यांचा अंतर्भाव असणार नाही.

(२) प्रस्थान करणारा कर्मचारी, त्याच्या ताब्यातील रकमेकरिता जबाबदार राहील, या शर्तीवर, विभागप्रमुख, एखाद्या विशिष्ट प्रकरणामध्ये उप विनियम (1) चे परंतुक लागू करण्यापासून सूट देऊ शकेल.

(३) रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याने कोणत्याही प्रकरणामध्ये अन्यथा निदेश दिला नसेल तर-

(क) रजेच्या अगोदर सुट्टया जोडलेल्या असतील तर, सुट्टयानंतरच्या दिवशी रजा आणि तदानुषंगिक वेतन व भत्ते यांची पुनर्व्यवस्था अंमलात येईल; आणि

(ख) रजेनंतर सुट्टया जोडलेल्या असतील तेव्हा, जर त्या सुट्टया जोडल्या नसत्या तर ज्या दिवशी रजा समाप्त झाली असती त्या दिवशी रजा समाप्त झाली असल्याचे मानले जाईल व त्या दिवसापासून तदानुषंगिक वेतन व भत्ते यांची पुनर्व्यवस्था अंमलात येईल.

**टीप:** आठवडयातील सुट्टीचा दिवस, सुट्टीच्या दिवशी संपूर्ण दिवसभर केलेल्या कामाच्या बदल्यात मंजूर केलेली पूरक रजा व वैकल्पिक रजा वरील प्रयोजनासाठी सुट्टी म्हणून मानता येईल.

## २०. रजा संपण्यापूर्वी कामावर परत बोलावणे

(१) कर्मचा-याची रजा संपण्यापूर्वी त्याला कामावर परत बोलविण्यासंबंधीच्या सर्व आदेशांमध्ये, त्याने कामावर

परत येणे वैकल्पिक आहे की सक्तीचे आहे हे नमूद करण्यात येईल.

(२) कामावर परत येणे वैकल्पिक असेल अशा बाबतीत, कर्मचा-यास कोणतीही सवलत मिळण्याचा हक्क असणार नाही.

(३) कामावर परत येणे सक्तीचे असेल तर अशा बाबतीत, कर्मचा-याला -

(क) ज्या रजेवरून परत बोलाविण्यात आले आहे ती रजा भारतातील असेल तर, मुंबईला परत येण्या साठी तो ज्या दिनांकाला निघेल, त्या दिनांकापासून कर्तव्यार्थ आहे असे समजण्यात येईल, आणि पुढीलप्रमाणे रकमा काढण्याचा त्याला हक्क असेलः-

(एक) याबाबत केलेल्या प्रवासासाठी अनुज्ञेय म्हणून असलेला प्रवास भत्ता; आणि (दोन) त्याला कामावर परत बोलावले असते तर त्याने ज्या दराने रजावेतन काढले असते त्याच दराने, तो त्या पदावर रूजू होईपर्यंतच्या कालावधीतील रजा वेतन.

(ख) ज्या रजेवरून परत बोलावण्यात आले ती रजा भारताबाहेरील असेल तर रजा मोजण्याच्या प्रयोजनासाठी जलप्रवासाकरिता त्याला लागलेला कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून गणला जाण्याचा आणि पुढीलप्रमाणे रकमा मिळण्याचा हक्क असेलः-

(एक) भारतामध्ये येण्यासाठी जलप्रवासाचा कालावधी आणि तो भारतात पोचल्याच्या दिनांकापासून त्याच्या पदावर रूजू होण्याच्या दिनांकापंतचा कालावधी

यांकरिता, त्याला कामावर परत बोलावण्यात आले असते तर ज्या दराने रजा वेतन मिळाले असते त्याच दराने रजा वेतन;

(दोन) भारतात येण्याचा प्रवास खर्च;

(तीन) त्याला परत बोलावण्यात आल्यावर भारतात येण्यासाठी तो ज्या दिनांकास निघाला असेल त्या दिनांकापर्यंत त्याच्या रजेचा निम्मा कालावधी किंवा तीन महिने यापैकी कमी असलेला कालावधी पूर्ण झालेला नसेल तर, भारतामधून बाहेर जाण्याचा प्रवास खर्च;

(चार) भारतात ज्या ठिकाणी तो पोचेल त्या ठिकाणापासून मुंबईपर्यंत येण्याच्या प्रवासाकरिता अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता.

## २१. रजेवरून परत येणे

(१) रजेवर असलेल्या कर्मचा-यास, त्याला मंजूर करण्यात आलेला रजेचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, रजा मंजूर करणा-या प्राधिका-याने तशी परवानगी दिल्याखेरीज कामावर परत येता येणार नाही.

(२) वैद्यकीय कारणास्तव रजा मंजूर करण्यात आलेल्या कर्मचा-याने, पोर्ट ट्रस्टच्या (विश्वस्त मंडळाच्या) वैद्यकीय अधिका-याकडून नमुना तीन मध्ये वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करेपर्यंत कामावर परत येता येणार नाही.

## २२. रजेवरून परत आल्यानंतर पदस्थापना करणे.

(१) रजेवरून परत येणा-या कर्मचा-यांस, तो रजेवर जाण्यापूर्वी त्याने जे पद धारण केले असेल त्या पदावर एक नित्याची बाब म्हणून रूजू

होण्यासंबंधी स्पष्ट आदेश नसतील तर, अशा पदावर रूजू होण्याचा हक्क असणार नाही.

(२) असा कर्मचारी, रजेवरून परत आल्यानंतर, रजा मंजूर करणा-या प्राधिका-याला अथवा रजा मंजूरीच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्राधिका-याला कामावर परत आल्याचे कळवील व आदेशांची प्रतीक्षा करील.

**<u>टीप</u>**: पूर्वी क्षयरोग झालेल्या कर्मचा-यासाठी कमी श्रमाच्या कामाची शिफारस करणा-या स्वास्थ्य प्रमाणपत्राच्या आधारे, त्याला कामावर रूजू होण्याची परवानगी देता येईल.

## २३. <u>रजा संपल्यानंतरची अनुपस्थिती</u>

(१) रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याने रजा वाढवून दिली असल्याखेरीज जो कर्मचारी अनुपस्थितीत राहील त्यास, अशा अनुपस्थितीच्या कालावधीसाठी रजा वेतन मिळण्याचा हक्क असणार नाही आणि तो कालावधी हा देय असेल तेवढी रजा आहे असे समजून त्याच्या रजाखाती खर्ची घालण्यात येईल आणि अशा देय रजेपेक्षा अधिक असलेला कालावधी असाधारण रजा असल्याचे समजण्यात येईल.

(२) रजा संपल्यानंतर बुध्दिपुरस्सर कामावर अनुपस्थित राहणारा कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरेल.

# प्रकरण चार

## देय व अनुज्ञेय रजेचे प्रकार

### २४. अर्जित रजा

(१) (क) (एक) एखादा कर्मचारी, एक सोडून एक कॅलेंडर वर्षात ३० दिवसांची अर्जित रजा मिळण्यास हक्कदार असेल.

(दोन) प्रत्येक कर्मचा-याच्या रजा खात्यात प्रत्येक वर्षी, १ जानेवारी व १ जुलै रोजी प्रत्येकी १५ दिवस अशा दोन टप्प्यांमध्ये अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात येईल.

(ख) मागील अर्ध्या वर्षीच्या शेवटी कर्मचा-याच्या खाती जमा असलेली रजा अशाप्रकारे नंतरच्या अर्ध्या वर्षात जमा केलेली अधिक मागील सहा महिन्यातील रजा मिळून ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक नसेल अशा शर्तीच्या अधीन राहून, पुढील सहा महिन्याच्या रजेमध्ये जोडली जाईल. परंतु, जेव्हा डिसेंबरच्या किंवा जूनच्या शेवटच्या दिवशी कर्मचा-याच्या रजा खात्यात जमा असलेली अर्जित रजा ३०० दिवस किंवा त्यापेक्षा कमी परंतु २८५ दिवसांपेक्षा अधिक असेल तेव्हा उप विनियम (१) च्या खंड (क)(दोन) अन्वये दर्शविलेल्या पध्दतीने १ जानेवारी किंवा १ जुलै रोजी आगाऊ जमा केलेली १५ दिवसांची मिळवून घ्यावयाची अर्जित रजा ही रजा खात्यात जमा करण्याऐवजी वेगळी ठेवण्यात येईल आणि कर्मचा-याने त्या सहा महिन्यात घेईल ती अर्जित रजा त्या रजेचे समायोजन केलेली आणि शिल्लक असल्यास ती रजा अशी शिल्लक अर्जित रजा अधिक अगोदरच जमा

केलेली रजा ही ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही या शर्तीच्या अधीन राहून, सहा महिन्यांच्या अखेरीस रजा खाती जमा करण्यात येईल.

(ग) (एक) कायम सेवेत नसलेल्या एखाद्या कर्मचा-यास सेवा खंडित न होता, एखाद्या स्थायी पदावर कायमपणे नियुक्त केले जाते तेव्हा, त्याची पूर्वीची सेवा त्याने कायम सेवेतील कर्मचारी म्हणून केलेली असती तर, त्याला जेवढी अर्जित रजा अनुज्ञेय झाली असती तेवढी रजा त्याने आधीच घेतलेली कोणतीही अर्जित रजा कमी करून, त्याच्या खाती जमा करण्यात येईल.

(दोन) जेव्हा एखादा कर्मचारी, स्थायी नियुक्तीच्या दिनांकापासून अर्धपगारी किंवा असाधारण रजेचा स्वतः लाभ घेतो तेव्हा अशी रजा, विनियम ८ च्या तरतुदींना अधीन राहून, त्याच्या रजा खात्याची पुनर्मांडणी/पुनर्हिशेब केल्यावर देय व अनुज्ञेय असलेल्या मर्यादेपर्यंत अर्जित रजेमध्ये रूपांतरित करता येईल.

**टीप**: मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (रजा) सुधारणा विनियम १९७५, यास शासनाची मंजुरी शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्याच्या दिनांकापूर्वी, जेव्हा अशा रजा अर्जित होण्याचे प्रमाण कर्तव्यार्थ व्यतीत केलेल्या कालावधीच्या १/२२ एवढे होते तेव्हा ज्या कर्मचा-यांची पहिल्या वर्षाची अथवा पहिल्या वर्षाच्या कोणत्याही भागातील सेवा अस्थायी स्वरूपाची होती, अशा कर्मचा-याला या खंडाच्या तरतुदी लागू होतील.

(घ) स्वीयेतर सेवेमध्ये व्यतीत केलेला कालावधी हा, अशा कालावधीबद्दल रजा वेतनाचे अंशदान

देण्यात येत असेल तर, या विनियमाच्या प्रयोजनासाठी कर्तव्य कालावधी म्हणून समजण्यात येईल.

(२) विनियम ५ व ३२ आणि या विनियमाच्या उप विनियम (१) व (३) याच्या तरतुदींना अधीन राहून, एकावेळी जास्तीत जास्त १८0 दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात येईल.

(३) वर्ग एक किंवा वर्ग दोनचे पद धारण करणा-या एखाद्या कर्मचा-याला १८0 दिवसांपेक्षा अधिक परंतु ३00 दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढी अर्जित रजा मंजूर करता येईल.परंतु अशाप्रकारे मंजूर केलेल्या रजेचा संपूर्ण कालावधी अथवा त्याचा कोणताही भाग भारताबाहेर व्यतीत केलेला असावा.

परंतु, या उप विनियमाखाली १२0 दिवसांपेक्षा अधिक अर्जित रजा मंजूर करण्यात आली असेल तर, अशा रजेचा भारतामध्ये व्यतीत केलेला एकूण कालावधी वर नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये.

## २५. <u>अर्जित रजेची गणना</u>

(१) एखाद्या कर्मचा-याची, ज्यावर्षी नियुक्ती झाली आहे, त्या कॅलेंडर वर्षाच्या सहा महिन्यांमध्ये जी सेवा देण्यास तो इच्छूक आहे ती सेवा पुर्ण केल्याच्या प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठी २ १/२ या दराने अर्जित रजा त्याच्या रजा खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

(२) (क) ज्या सहा महिन्यात एखादा कर्मचारी सेवेतून निवृत्त झाल्यामुळे किंवा त्याने राजीनामा दिल्यामुळे त्याच्या खाती जमा होणारी रजा, सेवानिवृत्तीच्या किंवा राजीनाम्याच्या दिनांकापर्यंत पूर्ण केलेल्या प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठी २ १/२ या दराने देण्यात येईल.

(ख) सेवेत असताना एखाद्या कर्मचा-यास सेवेतून काढून टाकल्यास किंवा बडतर्फ केल्यास अथवा त्याचा मृत्यू

झाल्यास त्याच्याखाती असलेल्या रजेमध्ये, सेवेत असताना ज्या कँलेंडर महिन्यामध्ये त्याला काढून टाकले जाईल किंवा त्याला बडतर्फ केले जाईल किंवा त्याचा मृत्यू होईल, अशा कॅलेंडर महिन्याच्या अखेरीस पूर्ण झालेल्या प्रत्येक कॅलेंडर वर्षामागे २ १/२ या दराने रजा जमा करण्यात येईल.

(३) एखाद्या कर्मचा-याने सहा महिन्यात अर्जित रजेव्यतिरिक्त इतर रजा घेतली असल्यास, पुढील सहा महिन्याच्या सुरूवातीस त्याच्या रजा खात्यात जमा होणारी रजा, अशा रजेच्या १/११ इतकी कमी केली जाईल. अशा प्रकारे कमी केलेली रजा ही, पुढील सहा महिन्याच्या सुरूवातीस जमा होईल अशा अर्जित रजेच्या कमाल कालावधीइतकी मर्यादित राहील, या शर्तीच्या अधीन असेल.

(४) एखादा कर्मचारी सेवानिवृति, राजीनामा, मृत्यू अथवा कोणत्याही कारणामुळे सेवेत असण्याचे बंद होते तेव्हा, उप विनियम (२) अन्वये, त्याच्या रजा खात्यामध्ये जमा करावयाच्या अर्जित रजेचे ठरीव प्रमाण, त्या सहा महिन्याच्या सुरूवातीला व तो सेवेत असण्याचे बंद झाले आहे असा दिनांक यादरम्यान कोणत्याही अर्जित रजेव्यतिरिक्त त्याने लाभ घेतलेल्या इतर रजेच्या कालावधीच्या १/११ या प्रमाणात कमी केली जाईल.

(५) अर्जित रजा जमा करताना, दिवसाच्या अपुर्णांकाचे नजीकच्या पूर्ण दिवसामध्ये रूपांतर करण्यात येईल.

## २६. <u>अर्धवेतनी रजा</u>

(१)(क) एखाद्या कर्मचा-यास, त्याने सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी २० दिवसांची अर्धवेतनी रजा मिळण्याचा हक्क असेल.

(ख) कर्मचा-याच्या अर्धवेतनी रजा खात्यामध्ये, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारी व १ जुलै या दिवशी प्रत्येकी १० दिवस अशा दोन भागांमध्ये प्रत्येक

महिन्याच्या आगाऊ अर्ध वेतनी रजा जमा करण्यात येईल.

(ग) ज्या वर्षी कर्मचा-याची नियुक्ती झाली आहे त्या कॅलेंडर वर्षाच्या सहा महिन्यामध्ये सेवा देण्यास एखादा तो कर्मचारी इच्छूक आहे, अशा सेवेच्या प्रत्येक पूर्ण केलेल्या कॅलेंडर महिन्यासाठी ५/३ दिवस या प्रमाणात उक्त रजाखात्यात रजा जमा करण्यात येईल.

(घ) सेवेतून सेवानिवृत्त होणा-या किंवा राजीनामा देणा-या एखाद्या कर्मचा-यास, सेवानिवृत्तिच्या किंवा राजीनाम्याच्या दिनांकापर्यंत प्रत्येक पूर्ण केलेल्या कॅलेंडर महिन्यासाठी ५/३ दिवस या प्रमाणात रजा मान्य करण्यात येईल.

(ङ) एखाद्या कर्मचा-यास सेवेत असताना त्यास सेवेतून काढले असेल किंवा बडतर्फ केले असेल किंवा त्याचा मृत्यू झाला असेल तेव्हा, ज्या महिन्यात त्याला सेवेतून काढून टाकले किंवा बडतर्फ केले आहे किंवा सेवेत असताना त्याचा मृत्यू झाला आहे, अशा कॅलेंडर महिन्याच्या पूर्ववर्ती कॅलेंडर महिन्याच्या अखेरपर्यंत प्रत्येक पूर्ण झालेल्या कॅलेंडर महिन्यासाठी ५/३ दिवस या प्रमाणात अर्ध वेतनी रजा जमा करता येईल.

(य) जेव्हा एखाद्या कर्मचा-याचा सहा महिन्यातील अनुपस्थितीचा किंवा निलंबनाचा कालावधी, "अनधिकृत अनुपस्थिती" म्हणून समजण्यात येईल. तेव्हा पुढील सहा महिन्याच्या प्रारंभी त्याच्या अर्धवेतनी रजा खात्यात जमा करावयाची रजा, १0 दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, "अनधिकृत अनुपस्थितीच्या" कालावधीच्या १/८ इतकी कमी करण्यात येईल.

(२) या नियमाअन्वये वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे किंवा खाजगी कामासाठी रजा मंजूर करता येईल.

(३) अर्ध वेतनी रजा देताना, अपूर्ण दिवसाचे नजीकच्या पूर्ण दिवसामध्ये रूपांतर करण्यात येईल;

परंतु, एखादा कर्मचारी कायमस्वरूपी कामावर नसल्यास त्या कर्मचा-यास पूर्णपणे आणि कायमस्वरूपी असमर्थ ठरविले आहे असे पोर्ट ट्रस्टच्या (विश्वस्त मंडळाच्या) वैद्यकीय अधिका-याने घोषित केले असल्या शिवाय, कर्मचारी त्याची रजा संपण्यापूर्वी तो कामावर परत येईल असे समजण्यास, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याकडे कारण नसले तर कोणतीही अर्धवेतनी रजा मंजूर करण्यात येणार नाही.

(४) एखादा कर्मचारी, ज्या दिवशी तो त्याच्या सेवेचे सहा महिने पूर्ण करील, त्या दिवशी रजेवर असल्यास, त्याला कामावर परत रूजू न होता अर्धवेतनी रजा मिळण्याचा हक्क असेल.

## २७. <u>परिवर्तित रजा</u>

(१) एखाद्या कर्मचा-यास, त्याला देय असलेल्या अर्धवेतनी रजेच्या निम्म्या परिवर्तित रजा, पुढील शर्तींच्या अधीन राहून, वैद्यकीय प्रमाणपत्रावर मंजूर करता येईलः-

(क) कर्मचारी रजा संपल्यानंतर कामावर परत रूजू होण्याची वाजवी शक्यता आहे अशी, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याची खात्री पटली पाहिजे.

(ख) सोबत जोडून घेतलेल्या अर्जित रजेचा व परिवर्तित रजेचा एकूण कालावधी २४0 दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

(ग) १९७५ चा टि.आर क्र.६६१ द्वारे वगळण्यात आले (१९ फेब्रुवारी, १९७६ पासून)

(घ) परिवर्तित रजा मंजूर करण्यात आली असेल तेव्हा, अशा रजेच्या दुप्पट दिवस देय अर्धवेतनी रजेच्या खाती खर्ची टाकण्यात येतील.

(ङ) कर्मचा-याने, सेवेतून राजीनामा दिल्यास किंवा तो स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्यास, परिवर्तित रजेच्या काळात काढलेले रजा वेतन आणि अर्धवेतनी रजेच्या काळात अनुज्ञेय असेलेले वेतन, यामधील फरकाची रक्कम परत करण्यात येईल अशी कबुली, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी त्या कर्मचा-याकडून घेईल.

१ (क) रजा मंजूर करणा-या प्राधिका-याला पोर्ट ट्रस्टच्या (बंदर विश्वस्तमंडळाच्या) हितासाठी म्हणून प्रमाणित केलेल्या एखाद्या मान्यताप्राप्त शिक्षणक्रमासाठी सेवेच्या संपूर्ण कालावधीत कमाल १८० दिवस इतकी अर्ध वेतनी रजा (वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल न करता) परिवर्तित करता येईल.

(२) परिवर्तित रजा मंजूर करण्यात आली असेल अशा कर्मचा-याच्या बाबतीत, त्याने सेवेचा राजीनामा दिल्यास अथवा त्याला त्याच्या विनंतीवरून कामावर परत रूजू न होता स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्यास परवानगी दिल्यास, परिवर्तित रजा ही अर्धवेतनी रजा असल्याचे समजण्यात येईल आणि परिवर्तित रजेचे रजा वेतन आणि अर्ध वेतनी रजेचे रजा वेतन यांमधील फरकाची रक्कम वसूल करण्यात येईल.

परंतु, कर्मचारी रूग्णावस्थेमुळे आणखी सेवा करण्यास असमर्थ झाल्याकारणाने सेवानिवृत्त होत असेल अथवा मृत्यू पावला असेल तर, अशी कोणतीही वसुली करण्यात येणार नाही.

**टीप**: कर्मचा-याला अर्जित रजा देय असली तरीही त्याच्या विनंतीवरून त्याला परिवर्तित रजा मंजूर करता येईल.

## २८. अनर्जित रजा

(१) निवृत्तिपूर्व रजा वगळून, इतर बाबतीत कायम सेवेतील कर्मचा-याला, पुढील शर्तीच्या अधीन राहून अनर्जित रजा मंजूर करता येतील:

(क) कर्मचारी रजा संपल्यानंतर कामावर परत रूजू होण्याची वाजवी शक्यता आहे, अशी रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याची खात्री पटलेली असावी;

(ख) त्यानंतर जेवढी अर्धवेतनी रजा अर्जित होण्याची शक्यता असेल त्या मर्यादेपर्यंत अनर्जित देय रजा असावी;

(ग) संपूर्ण सेवेच्या कालावधीतील अनर्जित रजा कमाल ३६0 दिवसांपर्यंत मर्यादित असावी. त्यापैकी वैद्यकीय प्रमाणपत्राखेरीज अन्य कारणास्तव एकावेळी जास्तीत जास्त ९0 दिवस आणि सर्व मिळून जास्तीत जास्त १८0 दिवस इतकी रजा असू शकेल;

(घ) कर्मचा-याची जेवढी अर्धवेतनी रजा त्यानंतर अर्जित होईल त्या रजेच्या खाती अनर्जित रजा खर्ची टाकण्यात यावी;

(ङ) कर्मचा-याने राजीनामा दिल्यास किंवा तो स्वेच्छेने सेवानिवृत झाल्यास, त्याला देण्यात आलेले रजा वेतन तो परत करील, अशी कबुली, रजा मंजूर करणारा प्राधिकारी, त्या कर्मचा-याकडून घेईल.

(२)(क) सेवेतून सेवानिवृत्त झाला आहे अशा कर्मचा-याला अनर्जित रजा मंजूर करण्यात आली असेल अथवा त्याच्या विनंतीवरुन त्याला कामावर परत रूजू न होता, स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्याची परवानगी दिली आहे अशा कर्मचा-याच्या बाबतीत ती अनर्जित रजा रद्द करण्यात येईल,

ज्या दिनांकास ती सुरू झाली असेल त्या दिनांकापासून सेवानिवृती अथवा राजीनामा अंमलात येईल आणि रजा वेतनाची वसुली करण्यात येईल;

(ख) अनर्जित रजा घेतलेला कर्मचारी कामावर परत रूजू होईल परंतु, अशी रजा अर्जित करण्यापूर्वी तो सेवेचा राजीनामा देईल किंवा सेवानिवृत्त होईल तर, त्यानंतर त्याची जेवढी रजा अर्जित झालेली नसेल तेवढया रजेचे रजा वेतन परत करण्यास तो जबाबदार राहील:

परंतु कर्मचा-यास रूग्णावस्थेमुळे आणखी सेवा करण्यास तो असमर्थ झाल्याकारणाने सेवानिवृत्त केले असेल किंवा त्याचा मृत्यू झाला असेल तर, खंड (क) किंवा खंड (ख) अनुसार रजा वेतनाची वसुली करण्यात येणार नाही.

## २९. <u>असाधारण रजा</u>

(१) कर्मचा-याला पुढील विशेष परिस्थितीत असाधारण रजा मंजूर करता येईल :-

(क) अन्य कोणतीही रजा अनुज्ञेय नसेल तेव्हा;

(ख) अन्य रजा अनुज्ञेय असेल परंतु कर्मचारी त्याला असाधारण रजा मंजूर करण्यात यावी, असा लेखी अर्ज करील तेव्हा;

(२) एखाद्या प्रकरणातील अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊन अध्यक्षाने निर्धारित केले नसेल तर, कायम सेवेत नसलेल्या कोणत्याही शासकीय कर्मचा-याला, पुढील मर्यादेहून अधिक अशी असाधारण रजा कोणत्याही, एका वेळी मंजूर करण्यात येणार नाहीः-

(क) तीन महिने;

(ख) सहा महिने, मात्र या विनियमा अन्वयेः खंड (क) खालील तीन महिने असाधारण रजा धरून, ज्या प्रकारची रजा देय आणि अनुज्ञेय असेल ती रजा संपण्याच्या दिनांकास कर्मचा-याची सलग तीन वर्षाची सलग सेवा पूर्ण झाली असली पाहिजे आणि या विनियमांनुसार आवश्यक असलेले वैद्यकीय प्रमाणपत्र अशा रजेसाठी त्याने केलेल्या अर्जासोबत जोडले पाहिजे.

(ग) बारा महिने, कर्मचा-याची सलग एक वर्षाची सेवा पूर्ण झाली असेल असा कर्मचारी कर्करोग किंवा वैद्यकीय आजार अशा आजाराच्या उपचारासाठी मान्यताप्राप्त संस्थेमध्ये किंवा अशा आजाराच्या विशेषज्ञांकडून उपचार घेत असला पहिजे.

(घ) अठरा महिने, आणि तो  एक वर्षाची सलग सेवा पूर्ण केलेला कर्मचारी -

(एक) फुफ्फुसाचा क्षयरोग किंवा क्षयरोगमूलक फुफ्फुसावरणदाह (प्लूरिसी) यासाठी मान्यताप्राप्त आरोग्यधामात - उपचार करवून घेत असला पहिजे;

**टीप**: कर्मचा-यास फुफ्फुसाचा क्षयरोग किंवा क्षयरोगजन्य फुफ्फुसावरणदाह (प्लूरिसी) झालेला असेल आणि तो आपल्या घरी संबंधित अर्हताप्राप्त क्षयरोग तज्ज्ञाकडून त्यावर औषधोपचार करवून घेत असेल आणि त्या विशेषज्ञाकडून तो उपचार करून घेत असल्याबद्दलचे व शिफारस केलेली रजा संपल्यानंतर तो बरा होण्याची वाजवी शक्यता असल्याचे त्या विशेषज्ञाच्या सहीचे प्रमाणपत्र त्या कर्मचा-याने सादर केले असेल तर,

त्यालाही अठरा महिन्यांच्या असाधारण रजेची सवलत अनुज्ञेय आहे.

(दोन) शरीराच्या अन्य कोणत्याही भागाच्या क्षयरोगावर अर्हताप्राप्त क्षयरोग विशेषज्ञाकडून उपचार करवून घेत असला पाहिजे; किंवा

(तीन) कुष्ठरोगासाठी एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेमध्ये किंवा अर्हताप्राप्त कुष्ठरोग विशेषज्ञाकडून उपचार करवून घेत असला पाहिजे.

(ङ) पोर्ट ट्रस्टसाठी मोलाचे ठरेल, अशा उच्च तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण सुरूकरण्याच्या प्रयोजनार्थ रजा आवश्यक आहे, असे अध्यक्षाचे मत असल्यास चोवीस महिने, मात्र संबंधित कर्मचा-याची वरील खंड (क) खालील तीन महिन्यांची असाधारण रजा धरून, या विनियमानुसार देय व अनुज्ञेय असलेली रजा संपण्याच्या दिनांकास तीन वर्षाची सलग सेवा पूर्ण झालेली असली पाहिजे.

(३) (क) उप विनियम (२) च्या खंड (ङ) मध्ये अंतर्भूत तरतुदी शिथिल करून, कर्मचा-यास असाधारण रजा मंजूर करण्यात आली असल्यास, अशी रजा संपल्यानंतर तो कामावर परत येत नसेल अथवा कामावर परत आल्यानंतर तीन वर्षाचा कालावधी समाप्त होण्यापूर्वीच सेवा सोडून जात असेल तेव्हा, त्याला अशा रजेच्या कालावधीमध्ये इतर मंडळाने केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची आणि अन्य कोणत्याही अभिकरणाद्वारे करण्यात आलेल्या खर्चाची त्यावरील व्याजासह मंडळाला परतफेड करण्याची कबुली देणारे बंधपत्र करून द्यावे लागेल.

(ख) या बंधपत्राच्या पुष्टयर्थ, कर्मचा-याच्या समान दर्जाचे अथवा त्याच्यापेक्षा वरचा दर्जा असलेले दोन स्थायी कर्मचारी जामीन म्हणून राहतील.

(४) असाधारण रजेच्या दोन कालावधीमध्ये दीर्घ सुट्टीचा कालावधी किंवा अन्य कोणत्याही प्रकारची रजा येत असेल तर, उप विनियम (२) च्या प्रयोजनासाठी हे दोन कालावधी असाधारण रजेचा एक अखंड कालावधी असल्याचे समजण्यात येईल.

(५) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, रजेशिवाय अनुपस्थितीच्या कालावधीचे भूतलक्षी प्रभावाने असाधारण रजेत परिवर्तन करूशकेल.

## ३०. <u>सेवानिवृतीनंतर पुनर्नियुक्त झालेली व्यक्ती -</u>

सेवानिवृत्तीनंतर पुनर्नियुक्त झालेल्या व्यक्तीच्या बाबतीत या विनियमांच्या तरतुदी, जणु काही, ती व्यक्ती, तिच्या पुनर्नियुक्तीच्या दिनांकास मंडाळाच्या सेवेमध्ये प्रथमच प्रविष्ट झाली आहे, असे समजून लागू होतील.

## ३१. <u>निवृत्तिपूर्व रजा-</u>

रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी अशा रजा, सेवानिवृत्तीच्या दिनांकासह त्या दिनांकापर्यंतच वाढविता येतील या शर्तीच्या अधीन राहून, देय अर्ध वेतनी रजेसह जास्तीत जास्त ३०० दिवसांपेक्षा अधिक नसतील अशा देय अर्जित रजेइतक्या निवृत्तिपूर्व रजा घेण्यास कर्मचा-यास परवानगी देऊ शकेल.

**<u>टीप</u>:** या विनियमाखाली मंजूर केलेल्या रजेमध्ये, असाधारण रजेचा समावेश होणार नाही.

## ३२. <u>सेवानिवृत्तीच्या अथवा सेवा सोडून जाण्याच्या दिनांकानंतरची रजा -</u>

(१) पोट विनियम (२) ते (८) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करून, कर्मचा-याला -

(क) त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर; किंवा

(ख) त्याचे काम अंतिमतः समाप्त झाल्याच्या दिनांकानंतर; किंवा

(ग) नियुक्ती करणा-या प्राधिका-याकडे नोटीस देऊन तो सेवानिवृत्त होईल किंवा नियुक्ती करणारा प्राधिकारी नोटीस देऊन त्याला सेवानिवृत करील, किंवा त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती यांनुसार अशा नोटीसऐवजी वेतन व भत्ते मिळतील, अशा दिनांकानंतर, किंवा

(घ) त्याने सेवेचा राजीनामा दिल्याच्या दिनांकानंतर, कोणतीही रजा मंजूर करता येणार नाही.

(२) जेव्हा एखाद्या कर्मचा-याने, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी पुरेशा वेळेत -

(क) निवृत्तीपूर्व रजा म्हणून देय असलेल्या रजेसाठी औपचारिक अर्ज केला असेल आणि रजा पूर्ण किंवा अंशतः रजा नाकारण्यात आली असेल तेव्हा, किंवा

(ख) अशा रजेसाठी अर्ज केला असेल तर सेवेच्या निकडीमुळे रजा मंजूर करता येणार नाही, अशी रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याकडून लेखी खात्री करून घेतलेली असेल त्याबाबतीत त्याला विनियम २४ मध्ये विहित केल्याप्रमाणे १८० दिवसांच्या किंवा यथास्थिति ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, सेवानिवृत्तीच्या उक्त दिनांकास त्याला देय असलेल्या अर्जित रजेची रक्कम, सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून मंजूर करता येईल.

जोपर्यंत, -

(एक) निवृत्तीपूर्व रजा ज्या दिनांकापासून सुरु होणार होती तो दिनांक आणि

सेवानिवृत्तीचा दिनांक यादरम्यान त्याला मंजूर केलेल्या रजेसह, अशा प्रकारे मंजूर करण्यात आलेल्या रजेची रक्कम, प्रत्यक्षात नाकारण्यात आलेल्या निवृत्तिपूर्व रजेच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(दोन) निवृत्तीपूर्व रजा म्हणून त्याने कोणत्याही असल्यास, अर्धवेतनी रजेसाठी अर्ज केलेला असेल आणि सेवेच्या निकडीमुळे ती नाकारण्यात आली असेल तर, निवृत्तीपूर्व रजा ज्या दिनांकापासून सुरू होणार होती तो दिनांक आणि सेवानिवृत्तीचा दिनांक यादरम्यान जेवढी रजा अर्जित केली होती तेवढया रजेच्या मर्यादेपर्यंतच्या अर्जित रजेशी अदलाबदल करता येईल.

**<u>टीप</u>:** सेवेत सक्तीने ठेवून घेणे किंवा निवृत्तीपूर्व रजेवरून परत बोलावणे यास निवृत्तीपूर्व रजेस ठाम नकार म्हणून समजण्यात येईल.

(३) ज्या कर्मचा-यास निलंबनाधीन असल्याच्या कारणावरून निवृत्तीपूर्व रजेसाठी अर्ज करण्यापासून प्रतिबंधीत करण्यात आले होते अशा कर्मचा-यास सेवानिवृत्तीच्या दिनांकाच्या पूर्ववर्ती १८० दिवसांच्या किंवा यथास्थिती ३०० दिवसांच्या आत ज्या कर्मचा-यास पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल आणि ज्याच्याबाबत, निलंबन पूर्णतः असमर्थनीय होते असे त्याला पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश देणा-या सक्षम प्राधिका-याचे मत असेल तेव्हा, अशा कर्मचा-यास विनियम (२४) मध्ये विहित केल्याप्रमाणे १८० दिवसांच्या किंवा यथास्थिति ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, ज्यासाठी

अर्ज करण्यापासून त्याला प्रतिबंध करण्यात आले होते अशा रजेचा लाभ घेता येईल.

(४) निलंबनाधीन असताना जो कर्मचारी सेवेतून निवृत्त झालेला असेल आणि निलंबनाधीन असल्यामुळे निवृत्तीपूर्व रजेसाठी अर्ज करण्यापासून ज्याला प्रतिबंधीत करण्यात आले होते आणि ज्याच्या बाबतीत त्याचे निलंबन हे पूर्णतः असमर्थनीय होते असे त्याला पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश देणा-या सक्षम प्राधिका-याचे मत झाले असेल तेव्हा, अशा कर्मचा-यास जणू काही ते पूर्वोक्तप्रमाणे नाकारण्यात आले आहे असे समजून कार्यवाही समाप्त झाल्यानंतर, विनियम (२४) मध्ये विहित केल्याप्रमाणे, १८0 दिवसांच्या किंवा यथास्थिति ३00 दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, त्याच्या खात्यात जमा असलेल्या रजेचा लाभ घेता येईल.

(५) लोकसेवा हितार्थ, एखाद्या कर्मचा-याची सेवा नियत सेवानिवृत्तीच्या तारखेपलिकडे वाढविण्यात आली असेल तेव्हा, अशा कर्मचा-यास, विनियम (२४) मध्ये विहित करण्यात आल्याप्रमाणे १८0 दिवसांच्या किंवा यथास्थिति ३00 दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, त्याला पुढीलप्रमाणे अर्जित रजा मंजूर करता येईल:-

(एक) वाढीव कालावधीमध्ये, अशा वाढीव कालावधीच्या बाबतीत देय असलेली कोणत्याही अर्जित रजा, आणि तो सेवानिवृत्त झाला असता त्या दिनांकास पोट विनियम (२) अन्वये त्याला मंजूर करण्यात आली असती, अशा आवश्यक मर्यादेपर्यंत अर्जित रजा;

(दोन) वाढीव कालावधी समाप्त झाल्यानंतर -

(क) तो सेवानिवृत्त झाला असता त्या दिनांकास वाढीव कालावधीमध्ये लाभ घेतलेली अशा रजे मधून वजा कलेली पोट विनियम (२) अन्वये त्याला मंजूर करता आली असती अशी अर्जित रजा; आणि

(ख) वाढीव कालामध्ये त्याच्या सेवेच्या अंतिम विरामापूर्वीच्या रजेसाठी पुरेशा वेळेत औपचारिकपणे अर्ज करण्यात आलेल्या आणि सेवेच्या निकडीमुळे त्याला रजा नाकारण्यात आलेल्या कालावधीमधील कोणतीही अर्जित रजा.

(६) ज्याला पोट-विनियम (१) च्या खंड (ग) लागू होतो अशा कर्मचा-यास तो ज्या तारखेस सेवेतून निवृत्त होईल किंवा सेवानिवृत्त झाला असेल अशा दिनांकानंतर वाढविता येऊ शकेल, परंतु त्याचे सेवानिवृत्तीचे वय किंवा नियत वयोमान ज्या दिनांकास पूर्ण होईल अशा दिनांकानंतर वाढविता येणार नाही, अशा देय व अनुज्ञेय रजा त्याला मंजूर करता येतील:

परंतु नोटीशी ऐवजी वेतन व भत्ते देऊन, नेमणूक करणा-या प्राधिका-याने ज्या कर्मचा-यास सेवानिवृत्त केले आहे, अशा कर्मचा-यास, ज्या कालावधीमध्ये असे वेतन व भत्ते देण्यात आले होते, त्या कालावधीमधील रजेसाठी अर्ज करता येईल, आणि जेव्हा त्याला रजा मंजूर केली असेल तेव्हा नोटीशीच्या ऐवजी ज्या कालावधीसाठी वेतन व भत्ते यासाठी, मुभा देण्यात आली होती, तो कालावधी वगळून, केवळ रजेच्या कालावधीसाठी रजा वेतन देण्यात येईल.

**टीप**: एखादा कर्मचारी सेवानिवृत्तीचे वय पूर्ण केल्यावर किंवा त्यानंतर त्याला देण्यात येईल असा सेवेचा असा वाढीव कालावधी समाप्त झाल्यावर त्याचा कोणत्याही पदावर कोणताही धारणाधिकार असण्याचे समाप्त होईल.

(७) जेव्हा कायम सेवेत नसलेल्या एखाद्या कर्मचा-याची सेवा नोटीशीद्वारे किंवा नोटीशीच्या ऐवजी वेतन व भत्ते देऊन अथवा त्याच्या नियुक्तीच्या अटीं व शर्ती अनुसार, अन्य प्रकारे समाप्त करण्यात आली असेल, तेव्हा, अशा कर्मचा-यास, १५० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून त्याच्या खाती जमा असलेली अर्जित रजा, जरी अशी रजा त्याच्या सेवा समाप्तीच्या दिनांकापेक्षा अधिक असली तरी देखील, मंजूर करता येईल. जर कर्मचा-याने स्वतः होऊन राजीनामा दिला असेल अथवा नोकरी सोडली असेल तर, त्याला कमाल १२० दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या निम्मी रजा मंजूर करता येईलः

परंतु सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतर पुनर्नियुक्त झालेल्या कर्मचा-याव्यतिरिक्त, इतर कर्मचा-याला अशा प्रकारे मंजूर करण्यात आलेली रजा, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापलीकडे वाढविता येणार नाही.

(८) पोट विनियम (५) चा खंड (एक) आणि त्या पोट-विनियमाच्या खंड (दोन) च्या उपखंड (क) खालील रजा वगळून या पोट विनियमाखाली मंजूर केलेली रजा, सेवांत रजा म्हणून समजण्यात येईल आणि तिचा सेवा विस्तार म्हणून अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

## 32.क **सेवानिवृत्तीच्या अथवा सेवा सोडून जाण्याच्या दिनांकानंतरच्या रजेच्या ऐवजी सममूल्य रोख रक्कम -**

(१) (क) जेव्हा एखादा कर्मचारी त्याच्या सेवेचे नियमन करणा-या अटीं व शर्ती नुसार सेवानिवृत्तीसाठी

विहित केलेले सर्वसाधारण वयमान पूर्ण केल्यानंतर सेवानिवृत होतो तेव्हा, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, त्याच्या सेवानिवृत्तीच्या किंवा नियत सेवावधीच्या दिनांकास, कर्मचा-याच्या खाती जमा असलेल्या, कोणत्याही, असल्यास, अर्जित रजेसाठी आणि/किंवा अर्धवेतनी रजेसाठी ३00 दिवसांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, रजा वेतनाच्या सममूल्य रोख रक्कम देण्याचा, आदेश देईल.

(ख) खंड (क) खालील रोख सममूल्याची रक्कम, एकाच वेळी चुकती करावयाची एक ठोक रक्कम म्हणून,देय असेल.

(२) रजा मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-यास, जो कर्मचारी निलंबनाधीन असताना किंवा त्याच्याविरूध्द शिस्तभंगाची किंवा फौजदारी कार्यवाही प्रलंबित असताना, त्याचे सेवानिवृत्तीचे वय पूर्ण झाल्यावर, सेवेतून सेवानिवृत्त होतो, अशा कर्मचा-याबाबत, त्याच्या विरूद्धच्या कार्यवाहीच्या निर्णयावरून, त्याच्याकडून काही रक्कम वसूल करण्यायोग्य असल्याची शक्यता आहे असे रजा मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याचे मत असेल तर त्यास त्याच्या अर्जित रजेच्या सममूल्याची संपूर्ण रोख रक्कम किंवा तिचा काही भाग रोखून ठेवता येईल. कार्यवाहीचा निकाल लागल्यावर, मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या समायोजनानंतर, अशाप्रकारे रोखून ठेवलेली, कोणतीही, असल्यास, रक्कम मिळण्यास तो पात्र ठरेल.

(३)(क)जेव्हा लोकसेवेच्या हितार्थ एखाद्या कर्मचा-याची सेवा, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांका पलीकडे वाढविण्यात आली असेल तेव्हा त्यास,

(एक) सेवा विस्ताराच्या कालावधीमध्ये अशा सेवा विस्ताराच्या कालावधीबाबत त्याला देय

असलेली कोणतीही अर्जित रजा अधिक विनियम २४ मध्ये विहित केल्याप्रमाणे १८० दिवस, किंवा यथास्थिति, ३०० दिवस इतक्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकास त्याच्या खाती जमा असलेली अर्जित रजा, मंजूर करता येईल.

(दोन) असा सेवा विस्तार कालावधी समाप्त झाल्यानंतर, ३०० दिवस इतक्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, त्याच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकास, त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजा अधिक अशा कालावधीत त्याने उपभोगलेली रजा वगळून अशा सेवा विस्तार कालावधी मध्ये त्याला प्राप्त झालेली अर्जित रजा, याबाबत, पोट विनियम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने अर्जित रजेच्या सममूल्याची रोख रक्कम मंजूर करता येईल.

(ख) या पोट विनियमाच्या खंड (क) च्या उपखंड (दोन) अन्वये प्रदेय असलेल्या सममूल्य रोख रकमेची, वरील पोट विनियम (१) च्या खंड (ख) मध्ये दर्शविलेल्या रीतीने गणना करण्यात येईल.

(४) जो कर्मचारी पोट विनियम (१) च्या खंड (ग) मध्ये नमूद केलेल्या रीतीने सेवेतून सेवानिवृत्त होईल किंवा सेवानिवृत्त झाला असेल अशा कर्मचा-याला, रजा मंजूर करणा-या प्राधिकारी ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेबाबत आणि त्याच्या खाती जमा असलेल्या संपूर्ण अर्ध वेतनी रजेबाबत देखील रजा वेतनाच्या सममूल्याइतकी रक्कम मंजूर करता येईल. परंतु हा कालावधी, ज्या दिनांकास तो अशाप्रकारे सेवानिवृत्त होईल किंवा सेवेतून सेवानिवृत्त झाला असेल असा दिनांक आणि सेवेचे नियमन करणा-या

अटीं व शर्तीनुसार, सेवानिवृत्तीसाठी विहित केलेले वय पूर्ण केल्यानंतर तो ज्या दिनांकास सामान्य क्रमात सेवानिवृत्त झाला असता, तो दिनांक, या दरम्यानच्या कालावधीपेक्षा अधिक असता कामा नये. सममूल्याची रोख रक्कम, अर्जित रजेकरिता अनुज्ञेय असलेल्या, रजा वेतनाइतकी असेल आणि/किंवा अर्ध वेतनी रजेकरिता अनुज्ञेय असणारे रजा वेतन अधिक ज्या दिनांकास कर्मचारी सेवेतून सेवानिवृत्त होईल किंवा सेवानिवृत्त झाला असेल त्या दिनांकास अंमलात असलेल्या दराने, पहिल्या ३00 दिवसांसाठीच्या रजा वेतनावर, अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्ता यांच्या इतकी असेल. निवृत्तीवेतन आणि निवृत्तीवेतनावरील इतर सेवानिवृत्तीच्या विषयक लाभाचे सममूल्य निवृत्तीवेतन, ज्यासाठी रोख सममूल्य रक्कम देय असेल अशा कोणत्याही असल्यास, अर्ध वेतनी रजेच्या कालावधीसाठी प्रदान केलेल्या रजा वेतनातून वजा केली जाईल. अशा प्रकारे गणना केलेली रक्कम, एकाच वेळी चूकती करावयाची एक ठोक रक्कम म्हणून देण्यात येईल. कोणताही घरभाडे भत्ता किंवा शहर पूरक भत्ता देय असणार नाहीः

परंतु जर अर्ध वेतनी रजा वेतन घटकाची रक्कम, निवृत्तीवेनाच्या आणि इतर निवृत्तीविषयक लाभाच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, अर्धवेतनी रजेच्या सममूल्याची रोख रक्कम मंजूर करण्यात येणार नाही.

(५) जेव्हा मुंबई बंदर विश्वस्त मंडळ कर्मचारी (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) विनियम, १९७६ च्या तरतुदीअन्वये, दंडाची उपाययोजना म्हणून, एखाद्या कर्मचा-याला सक्तीने सेवनिवृत्त केले असेल आणि शिस्तभंगाची कारवाई करणा-या प्राधिका-याने मुंबई बंदर विश्वस्त मंडळ निवृत्तीवेतन नियमाच्या नियम ८ अन्वये, त्याच्या निवृत्तीवेतनाच्या रकमेमध्ये कोणतीही कपात केली नसेल तेव्हा, रजा मंजूर करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, अशा सेवानिवृत्तीच्या दिनांकास

कर्मचा-याच्या खाती जमा असलेल्या कोणत्याही असल्यास, अर्जित रजेकरिता ३00 दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, पोट विनियम (२) च्या खंड (ख) मध्ये दर्शविलेल्या रीतीने रजावेतनाची सममूल्य रोख रक्कम, देण्याचा आदेश देईल.

(६) (क) (एक) जेव्हा एखाद्या कर्मचा-याची सेवा नोटीस देऊन अथवा नोटीशीच्या बदल्यात वेतन व भत्ते देऊन, किंवा अन्यथा त्याच्या नियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार, समाप्त करण्यात आली असेल तेव्हा, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी अशा कर्मचा-यास, ज्या दिनांकास तो सेवेत असण्याचे बंद होईल त्या दिनांकास त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्याबाबतीत 300 दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून सममूल्य रोख रक्कम मंजूर करू शकेल.

(दोन) जर एखाद्या कर्मचा-याने राजीनामा दिला असेल किंवा नोकरी सोडली असेल तर, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी अशा कर्मचा-यास, ज्या दिनांकास तो सेवेत असण्याचे बंद झाले होते, त्या दिनांकास त्याच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्याबाबतीत त्याच्या खाती जमा असलेल्या अशा रजेपैकी अर्ध्या रजेच्या मर्यादेपर्यंत १५0 दिवसांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून रोख सममुल्य रक्कम मंजूर करूशकेल.

(तीन) सेवानिवृत्तीनंतर पुनर्नियुक्त झालेल्या एखाद्या कर्मचा-यास, त्याची पुनर्नियुक्ती समाप्त झाल्यावर, रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, पुनर्नियुक्तीच्या समाप्तीच्या दिनांकास त्याच्या खात्यामध्ये

जमा असलेल्या अर्जित रजेच्या बाबतीत, ज्या कालावधीसाठी सेवा निवृत्तीच्या वेळी रजा रोखीकरण मंजूर केले होते त्या कालावधीसह कमाल ३00 दिवसांच्या मर्यादेच्या अधीन राहून, सममूल्य रोख रक्कम मंजूर करूशकेल.

(ख) खंड (क) खाली प्रदेय असलेल्या सममूल्य रोख रकमेची उप विनियम (२) च्या खंड (ख) मध्ये दर्शविलेल्या रीतीने गणना करण्यात येईल आणि खंड (क) च्या उप खंड (तीन) खालील सममूल्य रोख रकमेची संगणना करण्याच्या प्रयोजनार्थ पुनर्नियुक्ती समाप्त झाल्याच्या दिनांकाचे वेतन हे, निवृत्तीवेतन व सेवा निवृत्तिविषयक लाभाच्या सममूल्य निवृत्तीवेतन आणि त्या वेतनाला लागू असलेल्या महागाई भत्ता यांचे समायोजन करण्यापूर्वी पुनर्नियुक्तीच्या पदाच्या वेतनमानामध्ये निश्चित केलेले वेतन असेल.

**३२(ख) <u>सेवेत असताना मृत्यू झाल्यास रजा वेतनाची सममूल्य रोख रक्कम</u>:** सेवेत असताना कर्मचा-याचा मृत्यू झाल्यास, तो कर्मचारी मृत्यू पावला नसता आणि मृत्यूच्या दिनांकाच्या लगतनंतर, त्याला प्रदेय व अनुज्ञेय होणा-या अर्जित रजेवर गेला असता तर, त्या मृत कर्मचा-याला रजा वेतनाची जेवढी सममूल्य रोख रक्कम मिळाली असती तेवढी रक्कम परंतु १२0 दिवसांच्या रजा वेतनाहून अधिक होणार नाही इतकी रोख रक्कम, या रकमेतून निवृत्तिवेतन आणि मृत्यू-नि- सेवानिवृत्ति उपदानाचे निवृत्तिवेतन सममूल्य कमी करण्यास अधीन राहून, त्याच्या कुटुंबाला देण्यात येईल.

**<u>टीप</u>:** या विनियमानुसार अनुज्ञेय असलेल्या रजा वेतनाच्या सममूल्य रोख रकमेव्यतिरिक्त, मृत कर्मचा-याच्या कुटुंबास रजा वेतनाच्या अनुरूप महागाई भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

३३ (१) **रजा वेतन:** पोट विनियम (५) आणि (६) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करून, अर्जित रजेवर जाणा-या कर्मचा-यास रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी त्याला मिळालेल्या वेतनाइतके रजा वेतन मिळण्याचा हक्क असेल.

**टीप :** भारताबाहेरील स्वीयेतर सेवेमध्ये व्यतीत केलेल्या कोणत्याही कालावधीसंबंधात, कर्मचारी भारताबाहेरील स्वीयेतर सेवेमध्ये गेला नसता व भारतातच कामावर राहिला असता तर, त्याला जे वेतन मिळाले असते ते वेतन रजा वेतनाची गणना करताना प्रत्यक्ष काढलेल्या वेतनाऐवजी दिले जाईल.

(२) अर्धवेतनी रजेवर अथवा अनर्जित रजेवर असलेल्या कर्मचा-यास, वरील पोट विनियम (१)मध्ये आणि त्याखालील टिपेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेच्या निम्मी रक्कम, रजा वेतन म्हणून मिळण्याचा हक्क असेल.

(३) परिवर्तित रजेवर गेलेल्या कर्मचा-यास, पोट विनियम (१) व त्याखालील टिपेनुसार अनुज्ञेय असलेल्या रकमेइतके रजा वेतन मिळण्याचा हक्क असेल.

(४) असाधारण रजेवर असलेल्या कर्मचा-यास, कोणतेही रजा वेतन मिळण्याचा हक्क असणार नाही.

(५) जर एखाद्या कर्मचा-यास रजा कालावधीत मग तो निवृत्तीपूर्व किंवा अंतिम सेवा समाप्त होण्यापूर्वी असो, किंवा अन्यथा, लेखापाल, सल्लागार अथवा विधि किंवा वैद्यक व्यवसायी मग तो शासकीय विभागात किंवा स्थानिक प्राधिकरणात अथवा खाजगी नियोक्त्याच्या अधीन असो-, खाजगी व्यवसाय करण्यासह सेवा बाहेरील नोकरी स्वीकारण्याची परवानगी देण्यात आली असेल तर, जर अन्यथा अनुज्ञेय असेल तर त्याचे रजा वेतन, अर्धवेतनी रजेच्या कालावधीत अनुज्ञेय असलेल्या रजावेतनाइतके मर्यादित असेल.

(६) जर अशा पुनर्नियुक्तीच्या कालावधीमध्ये, कर्मचा-यास पुनर्नियुक्तीच्या कालावधीमध्ये त्याच्याकडे असलेली अर्जित रजा मंजूर केली असेल तर, त्याचे रजा वेतन हे, निवृत्तिवेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभांच्या सममूल्य निवृत्तिवेतन वगळून, त्याला मिळणा-या वेतनावर आधारलेले असेल.

(७) (क) जो सेवेतून सेवानिवृत्त होतो किंवा राजीनामा देतो, अशा कर्मचा-याच्या बाबतीत, जर त्याला देय असणा-या त्याच्या खाती जमा असलेल्या रजेपेक्षा त्याने अगोदरच जास्त रजा उपभोगली असेल तर, अशा कोणत्याही अधिक घेतलेल्या रजावेतनाबाबत, आवश्यक ते समायोजन करण्यात येईल.

(ख) सेवेत असताना ज्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल किंवा काढून टाकण्यात आले असेल किंवा त्याचा मृत्यू झाला असेल अशा एखाद्या कर्मचा-याने, अगोदरच घेतलेल्या अर्जित रजेचे प्रमाण हे विनियम २५ च्या पोट विनियम (२) च्या खंड (ख) अन्वये त्याच्या खाती जमा झालेल्या रजेपेक्षा जास्त असल्यास, रजा वेतनाचे अतिप्रदान, अशा प्रकरणी वसूल केले जाईल.

## ३४. कारखाना अधिनियम, १९४८ द्वारे नियमन केलेले कर्मचारी:

(१) जो कर्मचारी, कारखाना अधिनियम, १९४८ मध्ये अंतर्भूत असलेल्या त्या शब्दाच्या व्याख्येअंतर्गत जो "कामगार" आहे आणि त्याच्या खाती रजा जमा असलेली अर्जित रजा, विनियम २४ मध्ये विहित करण्यात आलेल्या (३00) दिवसांच्या कमाल मर्यादेपर्यंत पोहचल्या नंतर ज्याला रजा नाकारण्यात आली आहे, किंवा त्याला रजा देण्यास नकार देणारा आदेश लागू असताना त्याच्या खाती जमा असलेली अर्जित रजा, अशा मर्यादेपर्यंत पोहचलेली आहे अशा कर्मचा-याच्या बाबतीत, त्याला रजा नाकारणारा आदेश

लागू असण्याचे बंद होईपर्यंत, नाकारलेल्या रजेच्या प्रारंभाच्या प्रस्तावित दिनांकापासून प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्यामागे २ १/२ दिवस, या दराने, आणखी जमा झालेली अर्जित रजा घेण्याची परवानगी देण्यात येईल.

(२) कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये अंतर्भूत असल्याप्रमाणे त्या शब्दाच्या व्याख्येअंतर्गत जो "कामगार" आहे, अशा कर्मचा-याची सेवा, कारखान्याच्या आस्थापने मधील त्याच्या सेवेबाबतची [ ] संपूर्ण अर्जित रजा त्याने घेण्यापूर्वीच त्याच्या नियत सेवावधी व्यतिरिक्त इतर कारणामुळे समाप्त करण्यात आली असेल तर, किंवा अशा रजेसाठी त्याने अर्ज केला असता त्यास अशी रजा मंजूर करण्यात आली नसताना, रजा घेण्यापूर्वी त्याने नोकरी सोडली असेल तर, अशा कर्मचा-यास, ज्या दिनांकास, त्याची सेवा समाप्त करण्यात आली किंवा त्याने त्याची नोकरी सोडली त्याच्या लगतनंतरच्या दिनांकापासून त्याने लाभ न घेतलेल्या रजेचा त्याने लाभ घेतला असता तर त्याला जे वेतन व सेवा भत्ते मिळाले असते त्या रजेचे वेतन व सेवा भत्ते यांच्या इतकी सममूल्य रक्कम प्रदान करण्यात येईल.

(३) (क) जेव्हा एखाद्या कर्मचा-याची, ज्याला कारखाने अधिनियम, १९४८ लागू होतो अशा एखाद्या आस्थापनेमधून, ज्याला हा अधिनियम लागू होत नाही, अशा अन्य आस्थापनेकडे बदली केली असेल तेव्हा, अशा कर्मचा-यास, अशा बदलीच्या दिनांकास त्याच्या खाती जमा असलेली शिल्लक अर्जित रजा, अशा प्रकारे पुढे जमा केलेल्या अर्जित रजेचा अन्य आस्थापनेवरील सेवेत असताना, पुढील अर्जित रजेचा लाभ घेण्यापूर्वी, वापरण्यात यावी, या शर्तीच्या अधीन राहून, पुढे जमा करण्याची मुभा देण्यात येईल.

(ख) जेव्हा कारखाने अधिनियम, १९४८ लागू नसलेल्या एखाद्या आस्थापनेमधून एखाद्या कर्मचा-याची, तो अधिनियम लागू असलेल्या अन्य कोणत्याही आस्थापनेकडे बदली झाली असेल, तेव्हा, अशा कर्मचा-यास, त्याच्या खाती जमा असलेली अर्जित रजा, कारखान्याच्या आस्थापनेवरील सेवेसाठी पुढील अर्जित रजा संपविण्यात आल्यानंतरच केवळ अशी रजा वापरण्यात येईल या शर्तीच्या अधीन राहून, त्याच्या खाती जमा असलेली अर्जित रजा पुढे जमा करण्याची परवानगी देण्यात येईल.

**३५. <u>रजा वेतनाचे आगाऊ प्रदान</u> :** कमीत कमी ३० दिवसांच्या रजेवर जाणा-या कर्मचा-यास, पुढील शर्तीच्या अधीन राहून, रजा सुरू झाल्यापासून पहिल्या ३० दिवसांसाठीच्या रजा वेतनाची रक्कम देता येईलः

(एक) कर्मचा-याने अशा प्रदानासाठी, रजेस प्रारंभ होण्यापूर्वी, किमान दोन आठवडयांपूर्वी अर्ज केला असल्याखेरीज रजा वेतनाची कोणतीही आगाऊ रक्कम देता येणार नाही.

(दोन) मंडळाअंतर्गत तीन वर्षांहून कमी सेवा झालेली नाही असा कोणताही कर्मचारी, आगाऊ वेतन प्रदानासाठी पात्र असणार नाही.

(तीन) आगाऊ प्रदानाची रक्कम, नेहमीच्या वजातीनंतर कर्मचा-याला स्पष्टपणे अनुज्ञेय असलेल्या पहिल्या ३० दिवसांच्या रजेसाठीच्या रजा वेतनाच्या अधिक त्यासाठी योग्य असलेल्या भत्त्याच्या रकमेच्या निव्वळ रकमेच्या मर्यादेत असली पाहिजे.

(चार) ज्या कर्मचा-यास रजा वेतनाचे आगाऊ प्रदान केले आहे, असा कर्मचारी कोणत्याही कारणास्तव रजा घेण्यास असमर्थ असेल तर, हे आगाऊ प्रदान, कार्य

वेतनाचे व भत्त्याचे आणि/किंवा रजा वेतनाचे नंतरचे प्रदान म्हणून समजण्यात येईल. जर अशी प्रदान केलेली आगाऊ रक्कम, त्याला प्रत्यक्ष देय असलेल्या वेतन व भत्तयापेक्षा कमी आहे असे नंतर आढळून आले तर, यातील फरकाची रक्कम पूरक पत्रका मार्फत प्रदान करण्यात येईल.

## प्रकरण पाच

### ३६. विशेष प्रकारच्या रजा

(१) प्रसूती रजा : रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याला, दोन किंवा त्याहून कमी हयात मुले असलेल्या महिला कर्मचा-यास, रजा सुरू झाल्याच्या दिनांकापासून १३५ दिवसांच्या कालावधीसाठी, प्रसुती रजा मंजूर करता येईल. अशा कालावधीत, रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी आहारीत केलेल्या वेतनाइतके रजा वेतन, तिला देण्यात येईल.

(२) गर्भपातासह गर्भस्त्राव झाला असल्यास, त्यासाठी देखील, पुढील शर्तींच्या अधीन राहून, प्रसूती रजा मंजूर करता येईल:-

(क) गर्भपातासह गर्भस्त्रावाकरिता प्रसुती रजेचे प्रमाण, महिला कर्मचा-याच्या संपूर्ण सेवेमध्ये ४५ दिवसांपेक्षा जास्त असणार नाही.

(ख) रजेच्या अर्जासोबत विनियम १६ मध्ये निर्धारित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र जोडण्यात येईल.

(३) (एक) इतर कोणत्याही प्रकारच्या रजेसोबत प्रसुती रजा जोडून घेता येईल.

(दोन) विनियम २७ च्या पोट विनियम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीमध्ये काहीही असले तरी, प्रसुती रजेच्या अनुषंगाने त्यासाठी लागू असलेल्या एक वर्षाहून अधिक नसलेल्या कालावधी इतकीच रजा (परिवर्तित रजेसह) केवळ वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय मंजूर करता येईल.

(४) पोट विनियम (३) (दोन) अन्वये मंजूर केलेली रजा पुढे चालू ठेवताना, महिला कर्मचा-याच्या आजारासाठी, मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या वैद्यकीय अधिका-याने

स्वाक्षरित/ प्रतिस्वाक्षरित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावर मंजूर करता येईल. नवजात बाळाकडे मातेने वैयक्तिक लक्ष देण्याची गरज आहे आणि तिने बाळाजवळ राहणे अतिशय आवश्यक आहे, अशी स्थिती असल्याच्या अर्थाचे मुंबई बंदर विश्वत मंडळाच्या वैद्यकीय अधिका-याने स्वाक्षरित केलेले/प्रतिस्वाक्षरित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यास अधीन राहून, अशी रजा, नवजात बाळ आजारी असल्यास देखील मंजूर करता येईल.

(५) प्रसूती रजा, रजा खात्यातून वजा केली जाणार नाही.

(६) दोनहून कमी हयात मुले असलेल्या बंदर विश्वस्त मंडळाच्या पुरूष कर्मचा-याला (शिकाऊ उमेदवारासह), १५ दिवसांच्या कालावधीची पितृत्व रजा मंजूर करता येईल. अशा रजा कालावधीमध्ये, त्याला, रजेवर जाण्यापूर्वी तात्काळ काढलेल्या रकमेइतके रजावेतन प्रदान करण्यात येईल. पितृत्व रजा, त्याच्या रजा खात्यातून वजा केली जाणार नाही आणि ती कोणत्याही प्रकारच्या रजेसोबत (प्रसुती रजेच्या बाबतीत असेल त्याप्रमाणे) जोडून घेता येईल. कोणत्याही परिस्थितीत, या रजेसाठी सर्वसाधारणपणे नकार देता येत नाही.

(७) मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या महिला कर्मचा-याने, मूल दत्तक घेतल्यावर, तिला, एक वर्षाच्या कालावधीपर्यंत किंवा ते मूल एक वर्षाचे होईपर्यंत किंवा यापैकी जे अगोदर घडेल इतक्या कालावधीसाठी देय व अनुज्ञेय असलेल्या (वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय ६0 दिवसांहून अधिक नसेल इतकी देय व परिवर्तीत रजा नसलेल्या रजेसह) प्रकारची रजा मंजूर करता येईल. तथापि, तिला दत्तक घेतेवेळी, अगोदरच हयात असलेली दोन मुले असली तर, तिला ही सुविधा अनुज्ञेय असणार नाही.

३७. **<u>हेतुपुरस्सर केल्या गेलेल्या इजेच्या संबंधात विशेष विकलांगता रजा</u>** :

(१) जो कर्मचारी (स्थायी असो वा अस्थायी) जो आपले पदीय कर्तव्यांचे योग्य पालन करीत असताना, अथवा त्याच्या अधिकृत दर्जाचा परिणाम म्हणून त्याच्याशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीने हेतुपुरस्सर केलेल्या किंवा झालेल्या इजेमुळे विकलांग झाला आहे अशा कर्मचा-यास, रजा मंजूर करणारा सक्षम प्रधिकारी विशेष विकलांगता रजा मंजूर करू शकेल.

(२) विकलांगता ज्या घटनेतून उदभवली असेल त्या घटनेपासून तीन महिन्यांच्या आत ती उघड झालेली नसेल आणि विकलांग व्यक्तीने ती विकलांगता तत्परतेने निदर्शनास आणून दिली नसेल तर, अशी रजा मंजूर करता येणार नाही :

परंतु जेव्हा विकलांगतेस कारणीभूत झालेल्या घटनेनंतर तीन महिने उलटून गेल्यावर, ती विकलांगता उघड झाली असेल आणि अशा विकलांगतेच्या करणाबददल रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याची खात्री पटली असेल तेव्हा तो, अशा प्रकरणी, रजा मंजूर करण्यास परवानगी देऊ शकेल.

(३) मंजुर केलेल्या रजेचा कालावधी, बंदर विश्वस्त मंडळाच्या मुख्य वैद्यकीय अधिका-याने किंवा सहायक मुख्य वैद्यकीय अधिका-याने प्रमाणित केल्याप्रमाणे असेल व कोणत्याही परिस्थितीत तो २४ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(४) विशेष विकलांगता रजा, अन्य कोणत्याही प्रकारच्या रजेस जोडून घेता येईल.

(५) विकलांगता विकोपास गेली असेल किंवा तशाच परिस्थितीत नंतरच्या दिनांकास पुन्हा उदभवली असेल तर, एकापेक्षा अधिक वेळा विकलांगता रजा मंजूर करता येईल. परंतु अशी रजा कोणत्याही एका विकलांगतेच्या परिणामी, २४ महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी मंजूर करण्यात येणार नाही.

(६) निवृत्तिवेतनासाठी अर्हताकारी सेवेची गणना करताना, विशेष विकलांगता रजा सेवा म्हणून हिशेबात घेण्यात येईल आणि पोट-विनियम (७)च्या खंड (ख) च्या परंतुकान्वये मंजूर केलेल्या रजेव्यतिरिक्त विशेष विकलांगता रजा, रजा खाती खर्ची घालण्यात येणार नाही.

(७) अशा रजेच्या कालावधीतील रजावेतन पुढीलप्रमाणे असेलः

(क) पोट-विनियम (५) खाली मंजूर केलेला रजेचा कालावधी धरून अशा रजेच्या पहिल्या १२० दिवसांच्या कोणत्याही कालावधीसाठीचे, रजा वेतन, अर्जित रजेवर असताना मिळणा-या रजा वेतनाइतके असेल; आणि

(ख) अशा कोणत्याही उर्वरित रजेच्या कालावधीतील रजा वेतन, अर्धवेतनी रजेच्या रजावेतना इतके असेलः

परंतु, कर्मचा-याला, त्याच्या विकल्यानुसार, आणखी जास्तीत जास्त १२० दिवसांच्या कालावधीकरिता, खंड (क) अनुसार वेतन घेण्याची मुभा देता येईल, आणि त्या वेळी अशा रजेचा कालावधी, त्याच्या अर्धवेतनी रजेच्याखाती खर्ची टाकण्यात येईल.

(८) ज्या कर्मचा-यास श्रमिक भरपाई अधिनियम, १९२३ लागू होतो अशा कर्मचा-याच्या बाबतीत, एकतर या विनियामान्वये किंवा त्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, या पैकी जे त्याला अधिक लाभदायक असेल, त्यानुसार कार्यवाहीसाठी लागू असेल.

## ३८. अपघाती रजेबद्दल विशेष विकलांगता रजा :

(१) जो कर्मचारी मग तो स्थायी किंवा अस्थायी कर्मचारी असो आपल्या पदीय कर्तव्याचे योग्य पालन करीत असताना अथवा त्याच्या परिणामी, अपघाती इजेमुळे किंवा ज्या कामामुळे त्याचा आजार अधिक वाढण्याची शक्यता आहे, असे कोणतेही विशिष्ट काम पार पाडताना झालेल्या आजारामुळे किंवा तो जे पद धारण करीत असेल त्या पदाशी संलग्न असलेल्या सर्वसामान्य जोखमीपलीकडची इजा झाल्यामुळे विकलांग झाला असेल तर अशा कर्मचा-यास देखील, त्यालाही विनियम ३७ च्या तरतुदी लागू होतील.

(२) अशा प्रकरणी विशेष विकलांगता रजा मंजूर करणे हे पुढील शर्तींच्या अधीन असेल :-

(एक) जर विकलांगता ही, रोगामुळे आलेली असेल तर, ती विकलांगता एखाद्या विशिष्ट प्रकारचे काम प्रत्यक्षपणे पार पाडल्यामुळे उदभवलेली असल्याचे बंदर विश्वस्त मंडळाच्या मुख्य वैद्यकीय अधिका-याने किंवा सहायक मुख्य वैद्यकीय अधिका-याने प्रमाणित केली पाहिजे; आणि

(दोन) अशी विकलांगता, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याच्या मते, अपवादात्मक स्वरूपाची असली पाहिजे; आणि

(तीन) मुख्य वैद्यकीय अधिका-याने किंवा सहायक मुख्य वैद्यकीय अधिका-याने शिफारस केलेल्या अनुपास्थितीच्या कालावधीपैकी काही कालावधी या विनियमाखालील रजेमध्ये आणि काही

कालावधी अन्य कोणत्याही प्रकारच्या रजेमध्ये समाविष्ट करता येईल आणि अर्जित रजेवर असताना अनुज्ञेय असेल इतक्या रजा वेतनावर मंजूर केलेली विशेष विकलांगता रजा, १२० दिवसांहून अधिक होणार नाही.

## ३९. दूरस्थापन रजा :

(१) जेव्हा एखाद्या कर्मचा-याच्या कुटुंबात किंवा त्याच्या निवसस्थानातील कुटुंबात पोट विनियम (२) मध्ये वर निर्दिष्ट केलेल्या संसर्गजन्य रोग झाल्याच्या परिणामी अशा कर्मचा-याची त्याच्या कार्यालयातील किंवा कामाच्या ठिकाणची उपास्थिती ही, इतर कमर्चा-यांच्या आरोग्यास घातक असल्याचे ठरत असल्यास, अशा कर्मचा-याला दूरस्थापन रजा मंजूर करता येईल.

(२) पोट विनियम (१) च्या प्रयोजनार्य, पटकी, देवी, प्लेग, डिफथेरिय, विषमज्वर आणि सेरेब्रीस्पायनल मेनिन्जिटीस या आजारांना संसर्गजन्य आजार म्हणून समजता येईल, तथापि, रोगाचे ख-या स्वरूपाबददल (उदाहरणार्थ देवी) संशय असल्यामुळे रजा मंजूर करण्याचे कारण आहे, असा बंदर विश्वस्त मंडळीच्या किंवा नगरपालिकेच्या किंवा शासनाच्या वैद्यकीय किंवा आरोग्य अधिका-याचे मत असल्याशिवाय कांजण्यांना, संसर्गजन्य रोग म्हणून समजण्यात येणार नाही.

(३) (क) बंदर विश्वस्त मंडळाच्या, नगरपालिकेच्या किंवा शासनाच्या वैद्यकीय किंवा आरोग्य अधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे, २१ दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या किंवा अपवादात्मक परिस्थितीत ३० दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिकारी दूरस्थापन रजा मंजूर करुशकेल.

(ख) या कालावधीपेक्षा आवश्यक असलेली कोणतीही अधिक रजा, देय व अनुज्ञेय रजा म्हणून समजण्यात येईल

आणि ती कर्मचा-याच्या रजा खात्यातून वजा करण्यात येईल.

(४) पोट विनियम (३) मध्ये निर्धारित केलेल्या कमाल मर्यादेस अधीन राहून, आवश्यक असल्यास इतर कोणत्याही रजेसोबत रूग्णालयीन रजा जोडून घेण्याची मंजूरी देता येईल.

(५) दूरस्थापन रजेवर असलेला कर्मचारी, कर्तव्यावर असल्याचे समजण्यात येईल. तो अशा रजेवर असताना, त्याच्या बदली दूस-या व्यक्तीची नियुक्ती करता येणार नाही.

## प्रकरण सहा

## संकीर्ण

**४०. या विनियमात विशेषकरून तरतुद न केलेल्या बाबींमध्ये शासकीय नियम लागू असणे :** या विनियमांत किंवा त्याच्या लगतनंरतच्या सुधारणांमध्ये विशेष करून तरतूद न केलेल्या कोणत्याही प्रकरणामध्ये किंवा बाबींमध्ये, केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम १९७२ हे, सर्व साधारणपणे आणि मंडळाच्या आवश्यकतेनुसार सर्वसाधारणपणे ते जोपर्यंत स्वीकारले जातील तोपर्यंत लागू असल्याचे समजण्यात येईल.

४१. **अन्वयार्थ लावणे :** विनियमांचा अन्वयार्थ लावण्याच्या संबंधात जेव्हा कोणतीही शंका उदभवेल तेव्हा ती अध्यक्षांकडे निर्दिष्ट करण्यात येईल आणि त्यावर त्यांचा निर्णय अंतिम असेल.

**४२. विनियम शिथिल करण्याचा अधिकार :** या विनियमाच्या पैकी कोणत्याही विनियमांची अंमलबजावणी केल्या मुळे कोणत्याही विशिष्ट प्रकरणात अडचण होत असल्याबददल अध्यक्षांची खात्री पटली असेल तेव्हा, तो, लेखी नोंदवावयाच्या कारणास्तव या प्रकरणावर न्याय्य व योग्य रीतीने कार्यवाही करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशा मर्यादेपर्यंत आणि असे अपवाद व अशा शर्तीना अधीन राहून आदेशाद्वारे ते विनियम रदद करू शकेल किंवा या विनियमाची आवश्यकता शिथिल करूशकेल.

**४३. निरसन व व्यावृत्ति :**

(१) या विनियमांमध्ये अंतर्भूत केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींसाठी त्यात जोवर तरतूद असेल तोपर्यंत, या विनियमाच्या प्रारंभापासून अशा प्रारंभाच्या लगत पूर्वी अंमलात असलेला प्रत्येक नियम, विनियम, निर्णय किंवा आदेश, अंमलात असण्याचे बंद होईल.

(२) अशा प्रकारे अंमलात असण्याचे बंद झाले असले तरीही जुन्या विनियमान्वये कर्मचा-याने केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कृती किंवा त्याने घेतलेली किंवा त्याला मंजूर केलेली अथवा त्याच्या खाती उपर्जित केलेली कोणतीही रजा, या विनियमांच्या तत्सम तरतूदींखाली केलेली गोष्ट, केलेली कारवाई, घेतलेली, मंजूर केलेली किंवा उपार्जित केलेली रजा असल्याचे मानण्यात येईल.

# पहिली अनुसूची

## (विनियम ३ (१) (क) पहा )

## रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी

| अनुक्रमांक | पदाचा तपशील | रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी व मंजूर करता येतील असा रजेचा प्रकार | |
|---|---|---|---|
| | | प्राधिकारी | रजेचा प्रकार |
| (१) | (२) | (३) | (४) |
| * १ | वर्ग एक (मुंबई बंदर विश्वस्त मंडळ) अधिनियम, १९६३ याच्या कलम २४ अन्वये जर पदधारक, विभाग प्रमुख म्हणून समजावयाचे) | अध्यक्ष | अर्जित रजा, अर्धवेतनी रजा, परिवर्तित रजा, देय नसलेली रजा, असाधारण रजा, प्रसूती रजा, विशेष विकलांगता रजा |
| * २ | विभागप्रमुख व वर्ग दोनची पदे वगळून वर्ग एकची सर्व पदे | विभागप्रमुख | अर्जित रजा, अर्धवेतनी रजा, परिवर्तित रजा, देय नसलेली अदेय रजा, असाधारण रजा, प्रसूती रजा, विशेष विकलांगता रजा |
| ३ | वर्ग तीन (कनिष्ठ सहायक किंवा समकक्ष पदाशी संलग्न असलेली कमाल वेतनश्रेणी) | विभागप्रमुख | अर्जित रजा, अर्धवेतनी रजा, परिवर्तित रजा, अदेय रजा, असाधरण रजा, प्रसूती रजा, विशेष विकलांगता रजा. |
| ४ | वर्ग तीन (वरील अनुक्रमांक ३ मध्ये समाविष्ट न केलेले पद) आणि वर्ग चार पदे | (एक) विभागप्रमुख<br>(दोन) विभाग प्रमुख किंवा विभाग प्रमुखाने नामनिर्देशित केलेला उप विभाग प्रमुखापेक्षा कमी दर्जाचा नसलेला दुय्यम प्राधिकारी | (एक) विशेष विकलांगता रजा<br>(दोन) अर्जित रजा, अर्धवेतनी रजा, परिवर्तित रजा, अदेय रजा, असाधारण रजा, प्रसूती रजा |

* जी.एस.आर. क्र.३८ (ई), दि १५.१.१९९९ द्वारे समाविष्ट (एम.ओ.एस.क्र.पी.आर - १२0१६/१४/पी) पीई-दोन, दि.१५.१.१९९९.

## अनूसची दोन

**(विनियम ३ (१) ग पहा)**

**नमुना एक**

**(विनियम १२ पहा)**

**रजेसाठी किंवा रजावाढीसाठी अर्ज**

१. अर्जदाराचे नावः

२. धारण केलेले पदः

३. विभाग, कार्यालय व शाखाः

४. वेतनः

५. सध्याच्या पदावर मिळणारा घरभाडे भत्ता आणि इतर पूरक भत्तेः

६. मागितलेल्या रजेचे स्वरूप व कालावधी आणि रजा ज्या तारखेपासून पाहिजे असेल तो दिनांकः

७. रजेच्या मागे/पुढे असल्यास, जोडून घ्यावयाचे सुटीचे दिवसः

८. ज्या रजेकरिता अर्ज केलेला आहे ती रजा मागण्याची कारणेः

९. पूर्वीघेतलेल्या रजेवरून परत आल्याचा दिनांक आणि त्या रजेचे स्वरूप व कालावधीः

* १०. आगामी रजेमध्ये ------ या गटवर्षाकरिता मला उपलब्ध असलेली रजा प्रवास सवलत घेण्याचे प्रस्तावित करत आहे/ करत नाहीः

११. रजेच्या कालावधीतील पत्ताः

१२. राजीनामा दिल्यास किंवा स्वेच्छेने निवृत झाल्यास, पुढे नमूद केलेल्या रकमा परत करण्याची मी हमी देत आहेः-

(एक) विनियम २७ चा पोट विनियम (१) लागू करण्यात आला नसता तर, परिवर्तित रजेच्या कालावधीत मिळालेले रजा वेतन आणि अर्धवेतनी रजेच्या कालावधीत अनुज्ञेय असलेले रजा वेतन, यांमधील फरकाची अनुज्ञेय झाली नसती अशी रक्कम;

(दोन) विनियम २८ च्या पोट विनियम (१) लागू करण्यात आला नसता तर, जे अनुज्ञेय झाले नसते असे "अनर्जित रजेच्या" कालावधीत मिळालेले रजा वेतनः

*(लागू नसलेला मजकूर खोडावा)

अर्जदाराची सही
(तारखेसह)

१३. नियंत्रक (पर्यवेक्षकीय) अधिका-याचा शेरा आणि/किंवा शिफारस

सही (तारखेसह)
पदनाम

**रजेच्या अनुज्ञेयतेसंबंधी प्रमाणपत्र**

(वर्ग एक व वर्ग दोनच्या कर्मचा-यांच्या बाबतीत लेखापरीक्षा विभागाने द्यावयाचे)

१४. प्रमाणित करण्यात येते की, मुंबई बंदर विश्वस्त मंडळ कर्मचारी (रजा) विनियम, १९७५ याच्या विनियम ------ अनुसार त्यांच्या खाती ----- ते ------ पर्यंत --- दिवस -------------- रजा शिल्लक आहे. (रजेचेस्वरूप)

सही (तारखेसह)
पदनाम

१५. रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याचे आदेश.

सही (तारखेसह)
पदनाम

## नमुना दोन

रजेची किंवा रजावाढीची किंवा रजा परिवर्तित करण्याची शिफारस करण्यात आलेल्या कर्मचा-याकरिता वैद्यकीय प्रमाणपत्र

(विनियम १६ पहा)

कर्मचा-याची सही / अंगठयाचा ठसा

मी, --------------------- श्री/श्रीमती/कुमारी ------------- यांची काळजीपूर्वक वैयक्तिक तपासणी केल्यनंतर, मी -------- याद्वारे, असे प्रमाणित करतो की, त्यांना ----- हा आजार झाला आहे आणि त्यांची प्रकृती पूर्ववत होण्याकरिता त्यांना ----- पासून ----- पर्यंत कामावर अनुपस्थित राहणे नितांत आवश्यक आहे, असे मला वाटते.

मुंबई बंदर विश्वस्त मंडळ वैद्यकीय अधिकारी

दिनांक ----- रूग्णालय/दवाखाना

किंवा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी

टीप १: आजाराचे स्वरूप व संभाव्य कालावधी नमूद करण्यात यावा.

टीप २ : शक्यतोवर याच नमुन्याचा वापर करण्यात यावा आणि तो कर्मचा-याची सही घेतल्यानंतर भरण्यात यावा. एखाद्या विशिष्ट ठिकाणाहून किंवा विशिष्ट ठिकाणी जाण्याची गरज आहे किंवा एखाद्या विशिष्ट ठिकाणी जाण्यास तो असमर्थ आहे, असे प्रमाणित करणा-या डॉक्टरांना प्रमाणित करता येणार नाही. जेव्हा अशा कारणांवरून प्रशासकीय अधिका-यांकडे अर्ज करण्यात येईल तेव्हा, अर्जदार सेवा करण्यास पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी निर्णय घेणा-या संबंधित प्राधिका-याची स्पष्ट इच्छा असेल तरच केवल अशी प्रमाणपत्रे द्यावीत.

टीप ३: दुसरे वैद्यकीय मत घेणे आवश्यक असल्यास, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिकार-याने, शक्य तितक्या लवकर, मुख्य वैद्यकीय अधिका-याकडून त्याची दुस-यांदा वैद्यकीय तपासणी करून घेण्याची व्यवस्था केली पाहिजे. असा वैद्यकीय अधिकारी, कर्मचा-याच्या आजाराबददलची वस्तुस्थिती आणि शिफारस करण्यात आलेल्या

रजेची आवश्यकता याबददल आपले मत देईल आणि त्यासाठी कर्मचा-याला स्वतःसमोर किंवा स्वतःनामनिर्देशित केलेल्या वैद्यकीय अधिका-यासमोर उपस्थित राहण्यास सांगेल.

टीप ४ : या प्रमाणपत्रात केलेली कोणतीही शिफारस, कमर्चा-याला अनुज्ञेय नसलेली कोणतीही रजा मागण्यासाठी पुरावा ठरूशकत नाही.

टीप ५ : कर्मचा-याने वैद्यकीय उपचारासाठी उपस्थित राहण्यास जेथे नावनोंदणी केली आहे अशा मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या दवाखान्याद्वारे मुंबई बंदर विश्वस्त मंडळाच्या रूग्णालयाच्या सल्यावरून प्रमाणपत्र देण्यात आले असल्यास, प्रमाणपत्रावर कर्मचा-याच्या सहीची/अंगठयाच्या ठशाची आवश्यकता नाही.

**नमुना तीन**

**[विनियम २१ (२) पहा]**

**<u>कामावर परत येण्यासाठी वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्र</u>**

(जेव्हा कर्मचारी बंदर विश्वस्त मंडळाच्या वैद्यकीय अधिका-याच्या नियंत्रणाखाली उपचार घेत असेल तेव्हा द्यावयाचे)

कर्मचा-याची सही/अंगठयाचा ठसा --------------

मी, -------- वैद्यकीय अधिकारी मुंबई बंदर विश्वस्त मंडळ -------, दवाखाना, मुंबई बंदर विश्वस्त मंडळ, रूग्णालय, याद्वारे असे प्रमाणित करतो की, वर सही करणार/अंगठयाचा ठसा देणार, श्री/श्रीमती/कुमारी ------ यांची, मी काळजीपूर्वक तपासणी केली आहे. आता त्यांचा आजार बरा झाला असून, ते त्या, बंदर विश्वस्त मंडळाच्या सेवेत रूजू होण्यास पात्र आहेत. मी असेही प्रमाणित करतो की, हा निर्णय घेण्यापूर्वी, या प्रकरणी ज्यावरून रजा मंजूर करण्यात किंवा वाढविण्यात आली, ते मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) व तपशील (किंवा त्यांच्या प्रमाणित प्रती) यांची मी तपासणी केली असून, वरील निर्णय घेताना, ती विचारात घेतलेली आहेत.

दिनांक : ------

<u>वैद्यकीय अधिकारी</u>
मुंबई बंदर विश्वस्त मंडळ
------- रूग्णालय व दवाखाना

**<u>टीप</u> :** वरील प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-यापुढे, संबंधित प्रकरणात प्रारंभी ज्यांवरून रजा मंजूर करण्यात किंवा वाढविण्यात आली असे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे आणि तपशील प्रस्तुत करण्यात येतील, यासाठी मूळ प्रमाणपत्राच्या व तपशीलाच्या दोन प्रती तयार करण्यात याव्यात आणि त्यापैकी एक प्रत संबंधित कर्मचा-याने स्वतःजवळ ठेवावी.

## [नमुना तीन]

कामावर परत येण्यासाठी वैद्यकीय स्वास्थ्य प्रमाणपत्र

(कर्मचारी बंदर विश्वस्त मंडळाच्या वैद्यकीय अधिका-याच्या नियंत्रणाखाली उपचार घेत नसेल तेव्हा द्यावयाचे)

कर्मचा-याची सही/------
अंगठयाचा ठसा

मी, ------------- वैद्यकीय अधिकारी, मुंबई बंदर विश्वस्त मंडळ -------दवाखाना, मुंबई बंदर विश्वस्त मंडळ रूग्णालय, याद्वारे असे प्रमाणित करतो की, वर सही करणार/ठसा उमटविणार श्री/श्रीमती/कुमारी ------- यांची मी तपासणी केली आहे आणि ते/त्या बंदर विश्वस्त मंडळाच्या सेवेत त्यांचे /तिचे कर्तव्य पार पाडण्यास आज योग्य असल्याचे आढळून आले आहे.

वैद्यकीय अधिकारी,

दिनांक : -------

-----------मुंबई बंदर विश्वस्त मंडळ
दवाखाना /रूग्णालय

C1/vs/marathi-leave-regulation

# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचा-यांचे (रजेबाबत) विनियम, १९७५

**अनुवाद -**

**‘भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य’**

**टीप -**

**संदिग्धता असल्यास इंग्रजी पाठ ग्राहय मानला जाईल.**

**Translated by –**
**'Bhasha Sanchalanalaya, Maharashtra Rajya'**
**Note –**
**In case of ambiguity, English version shall prevail.**